# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

**Price Rs. 3/-**

# संवाद

॥ स्वयमेव मृगेंद्रता ॥

मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ॥
सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ॥

**Vol.-2** **Issue - 01** जुलै २००९ **July 2009**


## j संपादकीय

सभासद बंधूंनो,

ह्या वर्षी पर्जन्यराजाचे आगमन खूप लांबल्यामुळे आपण सर्वजण अगदी हवालदिल झालेलो होतो. 'नेमेचि येतो मग पावसाळा। हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा !' ही काव्यपंक्ती आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. साधारणपणे जून महिन्याच्या प्रारंभीच पावसाचं बरसणं सुरू होतं. पहिल्या पावसाचं सर्वांनाच किती अप्रूप असतं ! अगदी आबालवृद्ध त्या पहिल्या पावसाचा आनंद ओलेचिंब होऊन लुटतात. पण ह्यावर्षी मात्र आतुरतेने पावसाची वाट पाहणाऱ्या आपणा सर्वांनाच त्याची किती वेळ वाट पहावी लागली बरं ? अगदी आषाढी एकादशीपर्यंत पावसाचा कुठे मागमूसही नसल्यामुळे लक्षावधी वारकऱ्यांच्या बरोबर आपण देखील त्या पंढरीच्या पांडुरंगाला साकडं घातलं होतं. आपण मनापासून त्या प्राणप्रिय विठूमाऊलीपाशी पावसासाठी प्रार्थना केली होती. कारण आपल्याला पूर्ण खात्री होती की तो 'पंढरीरावोच' आपली प्रार्थना ऐकेल आणि आपल्यावर पर्जन्याचा वर्षाव करेल. 'संवाद' चा हा अंक वाचकांच्या हाती पडेपर्यंत महाराष्ट्रात व भारतवर्षात सर्वत्र पर्जन्यधारा तहानलेल्या धरित्रीच्या भेटीस आल्या असतील आणि सर्वत्र आनंदाचं अन् हर्षोल्हासाचं वातावरण असेल. नदी-नाले-तलाव पाण्याने भरू लागले असतील नि निसर्गाने हिरवा शालू परिधान केलेला असेल. 'हरित तृणांच्या मखमालीचे, हिरवे हिरवे गार गालिचे' सर्वत्र पसरलेले असतील.

उशीराने का होईना पण आपल्या भेटीस आलेल्या वरूणराजाचं हर्षोत्फुल्ल मनाने स्वागत करून आम्ही आमच्या वाचकांचं आज एका वेगळ्या विषयाकडे लक्ष वेधू इच्छितो. नुकताच मंगळवार दि. ३० जूनला 'तिन्ही सांजा' नावाचा मराठीतील एक नितांत सुंदर चित्रपट पाहण्याचा योग आम्हाला आला होता. 'वृद्धाश्रम' या सर्वांच्याच, विशेषत: ज्येष्ठ नागरिकांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयावरील हा चित्रपट असून त्यातील सर्व कलावंत मराठीतील आजचे आघाडीचे अन् प्रथितयश आहेत. 'तिन्ही सांजा' चा तो खेळ त्या दिवशी ज्येष्ठ नागरिकांसाठी नि:शुल्क ठेवलेला होता. असं असूनदेखील आम्हाला ते चित्रपटगृह प्रेक्षकांनी अर्धेच भरलेले पाहून विषादाचा अन् दु:खाचा धक्का बसला. वास्तविक हा चित्रपट कुटुंबातील प्रत्येकाने अगदी तिकिट खरेदी करून आवर्जून पाहावा असा आहे. ही त्या चित्रपटाची आम्ही जाहिरात करतो आहोत असा कुणीही कृपया समज करून घेऊ नये. तर सर्वांच्याच दृष्टीने जिव्हाळ्याच्या असलेल्या विषयावरील तेवढ्याच आत्मीयतेने सादर केलेली ही कलाकृती सर्वांनी पाहावी, त्यावर अंतर्मुख होऊन विचार करावा आणि त्यावर विचारमंथन व्हावं अशी आमची प्रामाणिक इच्छा व तळमळ असल्यामुळेच हे आमचे प्रेमाचे आवाहन. असो.

देशात नुकत्याच पार पडलेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसप्रणीत 'संयुक्त पुरोगामी आघाडी' ला (युपीए) स्पष्ट बहुमत मिळून स्थिर सरकारची स्थापना झाली. त्यानंतर दि. ३ जुलैला केंद्रीय रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांनी सन २००९-१० चा रेल्वे अर्थसंकल्प जाहीर केला तर दि.६ जुलैला केंद्रीय अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी या आर्थिक वर्षाचा देशाचा संपूर्ण अर्थसंकल्प सादर केला. या दोन्ही घटना प्रत्येक नागरिकावर कमी-अधिक परिणाम करणाऱ्या असल्यामुळे महत्त्वाच्या. या अर्थसंकल्पामध्ये सामान्य माणसाचा विचार करून त्याला अनेक सवलतींचा लाभ प्रदान करण्यात आल्यामुळे सर्वसामान्य जनतेकडून (आम आदमीकडून) त्यांचे सहर्ष स्वागत केलं जाणं यात नवल ते काय? कोणत्याही अर्थसंकल्पाचे सर्वांकडून निरपवाद स्वागत होणं ही गोष्ट केवळ अशक्यच असते. त्यावर काही प्रमाणात का होईना प्रतिकूल प्रतिक्रिया उमटतातच. त्यानुसार याही वेळी तसं घडलंच. पण तरीही बहुसंख्य नागरिकांना दिलासा देणाऱ्या अनेक तरतुदी रेल्वे अर्थसंकल्पात व केंद्रीय अर्थसंकल्पात असल्यामुळे मंदी व महागाईच्या आगीत होरपळणाऱ्या सर्वसामान्य जनतेकडून त्याचं मनापासून स्वागत झालं. आपणदेखील मनात कोणताही पूर्वग्रह न ठेवता खुल्या दिलाने या अर्थसंकल्पांचे स्वागत करून केंद्रीय अर्थमंत्री आपल्या न्याय्य मागण्यांच्या संदर्भात देखील सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेवून आपल्याला लवकरात लवकर न्याय देतील अशी आपण आशा करूया. धन्यवाद !

**- क्रांतिसेन रामचंद्र आठवले**

**On Federation front :**

1) Interest on delayed payment of arrears of revised pension payable to 8th Bipartite retirees :

One of our members from Patna Circle Association requested the Bank to pay interest on delayed payment of arrears paid to him. Bank refused to pay on the grounds that there is no provision to pay interest for the delay in payment of the arrears of revised pension. So, our Federation has taken up the matter vide its letter No.Fed/GS/042/2009-10 dt.27th June 2009 with the Corporate Centre requesting them to stipulate a time limit for revising the pension/family pension, as decided from time to time and issue instructions for payment of interest for the delay in payment of arrears after the stipulated time. The matter will be followed up further by the Federation.

2. Updation of Pension :

Federation has again taken up the matter with the Bank for updation of pension on 29-06-2009 to which Bank's reply is awaited.

3. 7th Bi-partite Retirees :

Our Federation is resorting all strategies to get the problem of 7th Bi-partite retirees resolved at the earliest, including persuation with appropriate authorities in Banking Dept of Finance Ministry, GOI, through personal good offices of our members. However, the response has been negative. Still Federation has continued its efforts.

4. Retired Employees Medical Benefit Scheme

The changes required to be made in the above scheme have already been brought to the notice of Corporate Centre by the Federation with an appeal to ensure that no discrimination is caused in admitting all the eligible members of Scheme-I and in making them eligible for the subsequent improvements made. The Bank is studying the cost involved in this regard and a decision would be taken by the Bank after receipt of report from the Actuaries. Federation have already made it clear to the Bank that any cut-off date restricting the admission to the Scheme will be resisted.

5. Gratuity Issue :

We understand that the Bank has taken up the matter with the Government for enhancing the ceiling on the lines of the proposal submitted by RBI. No decision appears to be taken in this regard.

6. Coordination with both the Federations :

Federation has initiated steps to hold the meeting of all three Federations before the **Ninth Bipartite Wage Revision negotiations** reach an advance stage. Federation have already communicated our views to both the Federations who are actually involved in the process.

**Attention : Officers retired after 1-04-2008**

Corporate Centre ( P & HRD Dept.) have issued an e-Circular No.CDO/P&HRD-PM/25/2009-10 dt.29-06-2009 in respect of revision of reimbursement of Entertainment expenses payable to the Supervising Staff who were getting reimbursement of entertainment expenses, depending upon their grades/scales upto prescribed ceiling. The Corporate Centre have decided to revise the ceilings stipulated vide its earlier Circular issued on 7th October 2006. **Revision is from financial year 2008-2009**.

Those retirees (from Supervising staff category) who were getting reimbursement of entertainment expenses during the service and **retired after 1-4-2008,** are requested to refer the above mentioned e-Circular which will be available at their Pension Paying Branch and submit their claims for arrears of entertainment expenses, if any, as per revised ceilings.

***- Secretary***

**N.B. :** The e-Circular is also available on our web-site in the "Link - 'Bank's Circulars' at Sr.No.19"

# PENSIONERS' WAY TO A HAPPY LIFE

*By - B.G.Dandekar, Advisor & Former President of our Federation*

(Courtesy - "Second Innings" -April - June 2009 issue published by the Bank)

One of my colleagues told me about the sad demise of a pensioner. I told him that his wife is eligible to receive family pension. Next day, my colleagues viz : Shri.S.B.Gokhale & Shri.S.M.Dharadhar, went to the Branch wherefrom the concerned pensioner (retired Executive) was receiving his pension. However, it was observed that the Family Pension to the wife of the deceased pensioner was not sanctioned. Prior to 1996, the Bank used to sanction only pension to the retirees. After the death of the pensioner, on receipt of an application from the spouse of the deceased pensioner, Zonal Office was required to submit a proposal through proper channel to Corporate Centre for sanction of Family Pension. It used to take more time for completion of this process, that too, if complete record is available (such as salary taken for calculating pension etc.)

In several cases, we were required to make a thorough search of such records. Due to this difficulty, in many cases the Family Pension was sanctioned after a considerable lapse of time.

In view of the above, we (i.e. our Federation) had requested the Bank authorities (at Central Office) to simultaneously sanction Family Pension to the spouse while sanctioning the pension to the employee as is being done in respect of Government employees. However, there was no response to it. In December 1995, Shri.P.G.Kakodkar became the Chairman of our Bank. We talked to him and explained the difficulties faced by the spouse of the deceased pensioner and requested him to accede to our request as narrated above. He readily agreed with us. Finally in May 1996, instructions were issued to all Local Head Offices to prepare simultaneous proposal for sanction of pension to the employee and Family Pension to the spouse of the employee. This scheme was also extended to earlier retirees (i.e. to those employees who retired prior to 1-11-1993). In such cases, it was necessary to prepare a new proposal and submit the same, through proper channel, to Central Office for sanction of Family Pension to the spouse of the pensioner. (Thanks to Shri.P.G.Kakodkar - our Former Chairman)

The pensioner, mentioned in para 1 above, retired prior to 1-11-1993. It was, therefore, necessary for him to approach the concerned LHO/Zonal Office for submission of a proposal for sanction of Family Pension to his spouse which was never done by him.

We have been advising these facts to our Members through Circulars and in Meetings also. However, we are sorry to state that many Members have ignored our suggestion. Therefore, after the death of such Pensioners, the sanction of Family Pension to their spouse is delayed. Even now there are pensioners whose family pension have not yet been sanctioned, mainly for want of initiative from the concerned pensioners.

The reason for stating all these details is obvious, as several suggestions made by us are ignored by our Pensioners for the reasons unknown to us. However, it results into causing innumerable hardships to the dependent family members. With this end in view, we are tempted to suggest as under :

1. Please get the Family Pension sanctioned when you are alive. Verify the particulars stated in the sanction advice such as, spelling of names, relation, affixing of joint photograph on the advices, amount of Pension/FDR where applicable etc. (Please prepare a special file for filing such important papers)
2. I.Card/Passbook issued by the Bank to Members of the Retired Employees Medical Benefit Scheme should be shown to other members of your family (viz. wife,son,daughter,daughter-in-law etc.). Passbook may be accessible easily.

3. Please take care that the standing instructions to your account in a CBS branch are carried over meticulously. please submit fresh nomination forms for all accounts and preserve the acknowledgements.
4. If you have a flat in Housing Society, have the same registered in joint names or register nomination. Obtain "confirmation copy" and file the same along with other papers mentioned above.
5. Always carry with you an identity card (with photograph) stating therein your address and phone numbers, name of the person to be contacted in case of emergency (with phone number and address), names of medicines for which you are allergic, blood group, position regarding diabetes, B.P. etc.
6. Information about all accounts in SBI as well as in other Banks should be written and shown to spouse and other members of the family.
7. All investments should be in the joint names, preferably.
8. If you want to donate your eyes, kidney etc., after death, it is to be recorded and such records to be preserved properly.
9. Names, addresses and telephone numbers of office-bearers of Pensioners' Association to be stored carefully for the purpose of communication in case of need.
10. Information and custody of **'will'** to be made known to all concerned.
11. Even in our Bank, transaction may be done across the counter along with Public. Give the feedback about the service etc. to the Branch Manager. Do not expect favours from the staff. Do not trouble the staff for "new notes".
12. Do not waste the time of the Branch staff by telling them 'Old Stories'. Where possible appreciate their work as well as difficulties.
13. Do not give un-called for 'Advice' to anybody (even to your nearest relatives also).
14. Do not hide any information from your spouse about your assets/liabilities (viz. Bank Accounts, TDRs, Shares, Property, Lockers, other valuables etc.).
15. Remember the difference between the words "Need" and "Greed". Excess needs ultimately turns into "Greed".
16. Respect others, then only others will respect you. Forget your designation you were holding prior to your retirement.
17. Always keep smiling; start your 'Second Innings' with fresh outlook to your 'New Life'. It is an another opportunity with you, to display your hidden talents.

If you observe these tips, you will be the happiest person in the years to come.

**ALWAYS REMEMBER, SBI IS OUR BANK**

With best wishes for a happy, healthy, wealthy and contented "Second Innings".

***- B.G.Dandekar***
1, Chaitraban, S.V.Road, Naupada,
Thane (W) - 400602
Phone (022) 25421794

**************

We reproduce the correspondence our respected senior member Shri.K.D.Paradkar had with Shri.B.G.Dandekar, Advisor to our Federation,and with the Chennai Circle Association, published in "Elders Voice"- June 2009 issue, a monthly house magazine of our Chennai Circle Association, on the ocasion of their 'Silver Jubilee'.

**************

**"We are much grateful to Shri. K.D.Paradkar, a pioneer of the pensioners' movement in our Bank for having sent his message of his greetings for the completion of 25 years of service by our Association and his generous donation of Rs.250/- sent through our Former Federation President and the present Advisor to our Federation Shri.B.G.Dandekar."**

**-o-o-o-**

(Letter to Shri.B.G.Dandekar by Shri.Paradkar)

"My Dear Shri.Balasaheb,

I remember that I had a talk with you about silver jubilee year of our SBI Pensioners'

Assn, Chennai, which was established on 20th May,'84.

A large number of pensioners in other states had enrolled their membership with our Association as per provisions in our old constitution. Especially retirees from South (more than 100) joined & became our members, mainly because of initiative of our Vice-President Shri.K.Natarajan and sincere efforts made by Sarva Shri.V.Vijay Raghavan and V.Rajgopalan from Chennai. In view of this position formation of independent unit at Chennai was encouraged.

Fortunately Shri.N.D.Ranganathan was present as our member on the occasion of our Annual General Meeting held on 15th February 1984 when 'Decade of Service Report 1974-1984' was published. In order to give prompt and efficient service to members in South and for the sake of convenience, we proposed to Shri.Ranganathan regarding the formation of separate unit at Chennai and he accepted our suggestion without hesitation.

To start with this work, a separate circular mainly for members in South was issued with a request to give consent for transfer of their life membership to new unit. Shri.Ranganathan also completed the necessary initial work such as selection of office-bearers, office for new unit, printing of stationery etc., within a small period of 2 months; he was successful in making all arrangements and declared inaugural function on 20th May 1984 with leadership of Shri.P.S.Santhanakrishnan. This grand meeting was attended by me as Secretary with Vice-president S/Shri.K.Natarajan and G.S.Aphale. More than 200 pensioners participated in the meeting inclusive of retired senior executives of our Bank. Shri.K.Natarajan delivered a nice speech on this ocassion with the history of our Association. Shri.Nair was Chief Guest as Secretary & Treasurer of Chennai LHO. He also praised our organizational set up and gave assurance for joining our Association on retirement. Shri.Ganesan represented on behalf of Staff Association and gave importance to pensioner's struggle. I remember that about 59 members opted for transfer of their Life membership to the unit at Chennai and two cheques amounting to Rs.10,000/- were presented on this ceremonial function. (This includes life membership fee Rs.100/- each). This work was going for further 2-3 months and finally very few members from South continued with us their membership as desired.

It is a great pleasure for me that the Almighty gave me a long life to express my joy and happiness regarding this inforgettable event in my life time. S/Shri.Santhanakrishnan and Ranganathan made history and struggled hard for our organizations. I will ever remember them for their sacrifice for welfare of Pensioners.

I do not know any development in this matter. I wish to pay a small donation of Rs.250/- to Chennai Unit. Please advise."

----------------

(An extract of Chennai Circle Association's letter to Shri.Paradkar)

To, 30-05-2009

Shri.K.D.Paradkar,

Dear Sir,

We are extremely grateful to you for your message of greetings in connection with the Silver Jubilee of our Association. With your blessings and the strong foundation laid by Shri. P.S.Santhanakrishnan and Shri. N. D. Ranganathan, our Founder President and Secretary respectively, our Association is growing from strength to strength in serving the cause of pensioners of our Bank. We have decided to celebrate the completion of 25 years of the existance of our Association in a fitting manner. We are much thankful for your kind donation of Rs.250/- to our Association. We seek your blessings and pray the almighty to keep you and members of your family in good health with adequate comfort and contentment."

*******************

## To All the Members of Mumbai Zonal Sub-Centre

As you know we have announced certain changes in the composition of the Mumbai Zonal Sub-Centre Committee at our Annual General Meeting held at Shivaji Mandir Natyagraha (Dadar) on the 22nd February 2009. You are also aware that the area of operation of the Mumbai Zonal Sub-Centre is covering the city of Mumbai, Thane and Raigad Districts which account for over 50% membership of the Circle Association. As the number of members is very large i.e. about 4300 , consisting of pensioner members - 3900 and Family Pensioner members - 400. As the geographical area covered by the sub-centre is spread over long distances, it has become necessary to introduce decentralization in the working and management of the Association and to tackle the diverse problems of the members by creating more posts of office-bearers to reduce the burden on the President and Secretary of the sub-centre.

Another reason for creating more posts of the office-bearers/Committee members was to train new active workers in all problems faced by our members and to generate new leadership in the Association and to encourage aspirations of new willing workers by giving them attractive posts coupled with additional responsibilities. The intention in doing this reorganization/ creation of new posts was to ensure that any problem in a particular Area/Branch would be first referred to the respective Regional Secretary/Committee Member due to his/her nearness to the residence of the Pensioner/Family Pensioner as also the nearness of the concerned Branch so that the problems could be sorted out quickly due to the contacts/liason developed by our office-bearers/committee members with the concerned Branch(es). In case the problems are complex or inviting policy matters, the concerned office-bearers/committee member would take up the matter with the top office-bearers.

We, therefore, give hereunder the names/ telephone numbers of all office-bearers/ committee members along with the names of the Branches allocated to them and shall be glad if our members, as far as possible, refer their problems to the respective office-bearers/ committee members and do not telephone or take up the matter in the first place with either the Circle President, Zonal President or Principal Secretary of the Mumbai Sub-Centre.

We assure the members our prompt attention to their problems.

**V.M.Gokhale**
President, Mumbai Zonal Sub-Centre

1) **Shri.S.M.Dharadhar, Vice-President** (Mobile-9819846465) :
(i) Wode House Road; (ii) Cuffe Parade; (iii) Nariman Point; (iv) Madam Cama Road; (v) Personal Banking Branch; (vi) Commercial Branch; (vii) Churchgate; (viii) Fort market; (ix) Service Branch; (x) Girgaum; (xi) Opera House; (xii) Mandvi; (xiii) Mumbai Central; (xiv) Napeansea Road (South); (xv) Napeansea Road (North); (xvi) Walkeshwar; (xvii) Gowalia Tank; (xviii) Huges Road; (xix) Peddar Road; (xx) Bhulabhai Desai Road; (xxi) Masjid; (xxii) Jacob Circle; (xxiii) Kala Chowky; (xxiv) Lalbaug; (xxv) Byculla; (xxvi) Mazgaon Dock;
2) **Shri.R.S.Rajiwdekar, Principal Secretary** (Mobile-9869451833)
(i) Santacruz (E); (ii) Santacruz (W); (iii) Vile-Parle (E); (iv) Vile-Parle (W); (v) Andheri (E);
3) **Shri.P.S.Uchgaonkar, Organising Secretary** (Mobile - 9969151179) :
(i) Goregaon (E); (ii) Goregaon (W); (iii) Malad (E); (iv) Malad (W); (v) Evershine Nagar; (vi) Jogeshwari (E); (vii) Jogeshwari (W);
4) **Shri.M.V.Nadkarni, Regional Secretary** (Resi.Phone - 022/26777339) :
(i) Khurad (Kurar)-Malad (E);(ii) Kandivali (E); (iii) Kandivali (W); (iv) Kandivali Indu. Estate; (v) Shankar Galli; (vi) Thakur Complex; (vii) Gokuldham;

**5) Miss Neela Vyavaharkar, Lady Secretary**
(Mobile - 9819682218) :
(i) Andheri (W); (ii) Versova; (iii) J.V.P.D.; (iv) P.B.B.Lokhandwala (Andheri)

**6) Shri.P.D.Chavan, Committee Member**
(Resi.Phone - 022/28691117) :
(i) Borivali (E); (ii) Borivali (W); (iii) Vazira Naka;(iv) Dahisar; (v) Mira Ind. Estate

**7) Shri.P.A.Lopes, Regional Secretary**
(Resi.Phone - 0250/2383220) :
(i) Bhayander; (ii) Vasai - All Branches; (iii) Virar; (iv) Palghar;(v) Dahanu Road; (vi) Talasari;

**8) Shri.B.P.Khare, Regional Secretary**
(Mobile - 9819173871) :
(i) Thane (E); (ii) Thane (W); (iii) Naupada; (iv) J.K.Gram; (v) Wagle Ind. Estate; (vi) Thane Trans Creek; (vii) PBB Vasant Vihar

**9) Shri.A.D.Butala, Committee Member**
(Resi.Phone - 022/25793938) :
(i) Marol; (ii) Sakinaka; (iii) I.I.T.Powai; (iv) Air Cargo; (v) Kurla (Depot); (vi) Kurla (W); (vii) Hiranandani (Powai); (viii) Vihar Lake; (ix) Safed Pul; (x) MIDC (Andheri);

**10) Shri.J.B.Pusalkar, Treasurer**
(Resi.Phone - 022/21636512) :
(i) Ghatkopar (E); (ii) Ghatkopar (W); (iii) Kanjur Marg; (iv) Vikhroli (E); (v) Vikhroli (W); (vi) Bhandup; (vii) Mulund (E); (viii) Mulund (W); (ix) Chembur; (x) Swastik Park; (xi) Swastik Park (Commercial); (xii) Deonar;

**11) Shri.S.W.Agarkar, Regional Secretary**
(Mobile - 9920597231) :
(i) Dombivali (E); (ii) M I D C, Dombivali; (iii) Kalyan; (iv) Ulhasnagar; (v) Ambarnath; (vi) Badlapur Ind. Estate; (vii) Bhiwandi; (viii) Konkan Bhavan; (ix) B P M C, Vashi; (x) Turbhe; (xi) Rabale;

**12) Shri.M.N.Mhatre, Committee Member**
(Resi.Phone - 022/24227247) :
(i) Worli Shivsagar Estate; (ii) Worli Sea Face; (iii) Worli (North); (iv) Lower Parel; (v) Parel; (vi) Naigam (Dadar); (vii) Dadar; (viii) Dadar IFB (E); (ix) Shivaji Park; (x) Wadala; (xi) Matunga; (xii) Mahim; (xiii) Bandra (E); (xiv) Bandra Linking Road; (xv) Bandra Carter Road; (xvi) Bandra Ferner Road; (xvii) Bandra Pali Market; (xviii) Dharavi; (xix) Khar (W); (xx) Veer Savarkar Marg; (xxi) Antop Hill;

## Congratulations

Shri.Abhijeet Sudhakar Deshpande s/o Shri.S.B.Deshpande, our member from Pune, has been conferred a Ph.D. degree by the University of Cincinnati U.S.A. in Civil Engineering. Shri.Abhijeet after obtaining a B.E. degree from Bombay University in first class went over to complete a Diploma in post graduation from the National Institute of Construction Management and Research (NICMAR), Pune. He was selected in a campus interview by an MNC in Mumbai. To obtain more knowledge, he resigned from the MNC and opted for training in USA where he was awarded a scholarship. He is now on the faculty of Auburn University in the State of Alabama in USA. On behalf of our Association we wish Abhijeet all the success in his future career.

- Secretary

## Corrigendum to the Report of the Managing Committee for the year 2008-2009

We draw attention to the report of the "Mumbai Dharna" published on page 11 of the 'SAMVAD' issue of June 2009 wherein name of one of the dignitaries, Shri.V.D.Deshpande, Vice-President, State Bank Officers' Association (Mumbai Circle) and Joint Gen. Secretary of All India State Bank Officers' Federation who addressed the gathering at Azad Maidan on 23rd Sept.2008 was inadvertently omitted to be mentioned in the list of speakers. **We regret for the omission**. The correction will be made and approved while adopting the Report in the ensuing AGM dt.22-07-2009 at Ahmednagar which please be noted.

***- Secretary***

## Appeal by our President to help Shri.Rajaram H.Jadhav, Dhule, who lost his house in recent riots at Dhule

As appealed by our President Shri.V.M.Gokhale in 'SAMVAD' issue of June 2009 we have started receiving donations for the purpose. Earlier also as per appeal of Shri.Dharmadhikari, Secretary of Aurangabad ZSC members have donated for the cause. We have now decided to publish the names of our members every month who contributed during the period. We are now publishing names of those who have donated from January 2009 till date for the information of members. No separate receipt will be sent/given to the donors and the name appearing in the list will indicate receipt of the amount. The total amount so collected will be sent to Shri.Jadhav by a draft made payable in his name every month. We append the list of donors.

| Name of the Member | Rs. |
|---|---|
| 1) Shri.S.M.Joshi, Satara | 501/- |
| 2) Mrs.Rekha Kshirsagar, Goregaon | 500/- |
| 3) Shri.S.R.Kanchalwar,Nanded | 500/- |
| 4) Mrs.Bharati S.Gadre,Thane | 1,000/- |
| 5) Shri.G.V.Chaphalkar,Kolhapur | 350/- |
| 6) Shri.Baburao Chaudhari,Kolhapur | 350/- |
| 7) Aurangabad Unit | 900/- |
| 8) Shri.N.K.Deo, Pune | 100/- |
| 9) Shri.V.V.Warty, Mumbai | 1,000/- |
| 10) Shri.Subhash Gugle,Nashik | 500/- |
| 11) Smt.Shakuntala Raut, Pune | 1,000/- |
| 12) Shri.S.P.Kulkarni, Kolhapur | 100/- |
| 13) Shri.V.M.Prabhudesai, Pune | 501/- |
| 14) Shri.Suresh V.Ranade, Pune | 100/- |
| 15) Shri.M.T.Deshpande, Nanded | 100/- |
| 16) Shri.M.H.Chakote, Nanded | 100/- |
| 17) Shri.S.T.Kulkarni,Nanded | 100/- |
| 18) Shri.V.M.Gokhale, Thane | 100/- |
| 19) Shri.B.G.Dandekar, Thane | 100/- |
| 20) Shri.S.B.Gokhale, Mumbai | 100/- |
| 21) Shri.S.M.Dharadhar, Mumbai | 100/- |
| 22) Shri.R.S.Rajiwadekar, Mumbai | 100/- |
| 23) Shri.P.S.Uchgaonkar, Mumbai | 100/- |
| 24) Shri.J.B.Pusalkar, Mumbai | 100/- |
| 25) Miss Neela Vyavaharkar, Mumbai | 100/- |
| 26) Shri.P.A.Lopes, Mumbai | 100/- |
| 27) Shri.B.P.Khare, Thane | 100/- |
| 28) Shri.R.N.Lalingkar, Pune | 1000/- |

**Tourways Advertisement**


**सेवानिवृत्तांनो, कृपया इकडे लक्ष द्या**

साठीनंतर आपण आरोग्याची विशेष काळजी घेतो त्यासाठी रक्त, लघवी, हृदय, कोलेस्ट्रॉल याची चाचणी करून घेतोच. पण आपण कधी आपल्या शरीराचं विश्लेषण (Body Analysis) केलं आहे का ? हे जर केलं नसेल तर ताबडतोब खालील पत्त्यावर या. विशेष म्हणजे ही तपासणी व सल्ला दोन्हीही अगदी मोफत. तपासणीला ५ मिनिटे व सल्ल्यासाठी १० मिनिटे अशी फक्त १५ मिनिटे वेगळी काढा. वेळ सकाळी ७ ते १०. विशेष सूचना : येताना रिकाम्या पोटी या. सोबत आपले शेजारी, नातेवाईक आणले तरी चालतील.

**Neutrino - The Nutrition Club**

**SIPL Digital Planet**

२१४६ सुखदा अपार्टमेंट, हॉटेल कावेरी समोर,
ना.सी.फडके सभागृह चौकाजवळ, पुणे ४११०३०

**अधिक माहितीसाठी संपर्क करा.**

*** शरद महाबळ : ९३७२४२८३२२**

*** मंदार फाटक : ९३७०३२४२५१**

(Advt.)

# संवाद लेख स्पर्धा २००९

(पुरुष विभाग - द्वितीय पारितोषिक विजेता लेख)

## ''सेवानिवृत्ती झाली - पुढे काय ?''

नोकरी करणाऱ्या माणसाला निवृत्त हे व्हावेच लागते आणि निवृत्तीनंतर काय ? निर्माण होते एक प्रचंड पोकळी !

झोनल ऑफिसमध्ये काम करताना स्टोअरमध्ये मी मूक बधिर मुलांच्या वस्तूंचे विक्री/प्रदर्शन भरविले होते. त्यावेळी सुहृदमंडळाच्या एका पदाधिकाऱ्याने निवृत्ती कधी आहे ? आणि निवृत्तीनंतरच्या जीवनाचा विचार करायला सुरूवात केली आहे काय असे विचारले.

अहो ! निवृत्तीला अजून सात वर्षे आहेत आणि निवृत्तीनंतर सामाजिक कार्य करायचे असे मी ठरविले आहे.

तुमचा विचार स्तुत्य आहे पण सामाजिक कार्य जर करायचे असेल तर त्या संस्थेचा आणि आपला परस्परपरिचय व्हावा लागतो हे माझे अनुभवाचे बोल आहेत बरं !

माझा एक सहकारी श्री.सुनिल सुखात्मे हा लायन्स क्लब कोथरूड पुणे येथे कार्यरत आहे. त्याने मला लायन्स क्लबच्या एका कार्यक्रमाला निमंत्रित केले. कार्यक्रम पाहताना लायन्स क्लबचे सामाजिक कार्य लक्षात आले आणि सुनिलच्या विनंतीवरून लायन्स क्लब कोथरूडचे सभासदत्व स्वीकारले. दिशा निश्चित झाली आणि विचारांचा भुंगा दूरवर पळाला.

लायन्स क्लबचे सभासदत्व घेतले. संस्थेचा परिचय करून घेतला आणि माझा परिचय संस्थेला करून दिला. समाजातील प्रतिष्ठित माणसे लायन्स क्लबमध्ये मिसळून जाताना पाहिले आणि त्या भावविश्वाचा मीही एक भाग बनून गेलो.

२००१ साली आमच्या क्लबने मला सेक्रेटरी केले आणि माझ्या पात्रतेची परीक्षा घेतली त्यात मी उत्तीर्ण झालो. पुढच्या वर्षी माझी अंतर्गत लेखापरीक्षक (मंडळ) ह्या पदावर बदली झाली आणि मी घरापासून दूर वेगवेगळ्या ठिकाणी जाऊ लागलो. अनेक दिवस कुटुंब आणि मित्रांची भेट होईनाशी झाली. मग या काळात वेगवेगळ्या गावी कार्यरत असणाऱ्या लायन्स क्लबशी माझा परिचय होऊ लागला. त्यांच्या सेवाकार्याची माहिती मिळू लागली व लायन्स क्लब बरोबरचे नाते अधिक दृढ झाले.

२००७ साली बँकेच्या सेवेतून मी निवृत्त झालो आणि जोमाने लायन्स क्लबच्या सेवाकार्यात भाग घेऊ लागलो.

इ.स. २००८ ला पुणे नाशिक नगर या जिल्ह्याचे प्रांतपाल लायन सी.ए.जितेंद्र मेहता यांनी तलावातून बाहेर पडून महासागरात पोहण्याची संधी दिली. १०५ क्लबचे एडस् अवेअरनेस चे प्रमुख म्हणून लायन सी.ए. अभय शास्त्री यांच्या बरोबर काम करण्याची विनंती केली. क्लबच्या लहान सेवाकार्यातून जिल्हास्तरावर काम करण्याची ही संधी मी स्वीकारली.

भानावर आल्यावर परिस्थितीची जाणीव झाली. आपल्या कामाचा विचार करताना लक्षात आले की आपल्याला एडस्बद्दल काहीच माहिती नाही. कशा प्रकारे जनजागृती करायची याचा अभ्यास नाही. खरे ज्ञान कोणाकडून मिळेल याची कल्पना नाही.

एडस् हा नैतिकता न पाळल्यामुळे होणारा रोग आहे याची जाणीव झाल्यामुळे जनजागृतीसाठी 'नैतिकता पाळा, एडस् टाळा' हे घोषवाक्य ठरवून काम करण्याचे ठरविले. आमच्या फॅमिली डॉक्टरांकडून एडस्विषयी थोडी माहिती मिळवली. अधिक माहिती मिळवण्यासाठी 'नॅशनल एडस् रिसर्च इन्स्टिट्यूट' (नारी) संस्थेच्या संचालिका डॉ.सीमा सहाय यांची भेट घेतली.

डॉ.सीमा सहाय यांनी मला एक प्रश्न विचारला - 'रेड-रिबिन म्हणजे काय ?' - रेड रिबिन ही उद्घाटनाला वापरतात तसेच बिल्ले करण्यासाठी वापरतात असे मी उत्तर दिले. माझे उत्तर ऐकून डॉक्टरीण बाई हसल्या व म्हणाल्या रेड रिबिन ही एचआयव्ही ची खूण आहे. मी म्हणालो, मी तर एडस् अवेअरनेसच काम करत आहे. एच.आय.व्हीचा संबंध कुठे येतो ?

माझे अगाध ज्ञान पाहून त्यांनी सांगितले की, ढोबळ मानाने प्रतिकार शक्ती असताना जो आजार असतो त्याला एच आय व्ही म्हणतात व प्रतिकारशक्ती संपली की त्यालाच एडस् म्हणतात. एच आय व्ही वरती प्रतिकार शक्ती वाढविणारी औषधे आहेत आणि नियमित व्यायाम, योग्य आहार आणि औषधे यामुळे डायबिटीस, हायपरटेंशन प्रमाणे हा आजार सांभाळून व्यक्ती कार्यरत राहू शकते. पण एडस् झाला की मृत्यू मात्र अटळ.

एकंदरीत माझी उत्सुकता पाहून त्यांनी मला संस्थेचे रक्त तपासणी विभाग, औषध विभाग, समुपदेशन विभाग, प्रचार साहित्य विभाग वगैरे दाखविले व काही पुस्तके वाचायला देऊन तुम्हाला काय समजले आहे त्याचे टिपण घेऊन परत बोलावले.

आठ दिवसांनी टिपण घेऊन गेल्यावर त्यांनी काही बदल, काही सूचना सुचविल्या व आम्ही एच आय व्ही एडस्वर एक पुस्तिका तयार केली. या पुस्तिकेच्या १२००० प्रती काढून कॉलेजांमध्ये वाटण्याची पूर्वतयारी केली. मनातले सर्व प्रश्न संपून जन-जागृतीला एक दिशा मिळाली.

प्रकाशनापूर्वी ही पुस्तिका महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाला दाखविली. जगजागृतीसाठी अशी पुस्तिका लायन्स क्लबतर्फे काढली जात आहे हे पाहिल्यावर पुण्याच्या महापौरांनी आमच्या या कार्याला आशीर्वाद दिला व पुस्तिकेसाठी संदेशही दिला त्यामुळे माझा उत्साह द्विगुणीत झाला.

१५ ऑगस्ट रोजी आमच्या एका क्लबने ५०० रिक्षा, २५० टेंपो यांच्या साहाय्याने पुण्यात एडस् जन-जागृती यात्रा काढली. पुण्याच्या वेश्या विभागात रॅलीमध्ये लावलेल्या फलकांबद्दल खूप उत्सुकता दिसून आली. जनजागृतीला प्रारंभ झाला.

केंद्र सरकारची रेड रिबिन नावाची एक रेल्वे गाडी पुण्यात

आली आणि एक धक्का-माहिती आम्हाला समजली.

भारत एडस्ग्रस्तांमध्ये जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारतात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात मुंबई प्रथम क्रमांकावर आणि पुणे द्वितीय क्रमांकावर.

दर मिनिटाला ५ एच आय व्ही ग्रस्त होत आहेत तर एडसने २ जणांचा मृत्यु होत आहे हे स्टॅटिस्टिक ज्यांनी एच आय व्ही टेस्ट केली आहे त्यांच्याबद्दल आहे. आणि भारतात दरवर्षी फक्त ५% लोकच रक्त तपासणी करून घेत असतात.

पुण्यात एका रक्तदान शिबिरात गोळा केलेल्या १००० बाटल्यांपैकी ३०० बाटल्या रक्त एच आय व्ही पॉझिटिव्ह होते. ऐकून मन अस्वस्थ झाले. विषयाचा आवाका कळला. मनाचा निश्चय झाला या पुढील आयुष्यात एडस् जनजागृती साठीच काम करायचे.

दहीहंडीच्या दिवशी एका क्लबने दहीहंडी कार्यक्रमाला निमंत्रण दिले होते. दहीहंडी लहान मुलांची होती. दहीहंडी फोडण्यासाठी एक साधारण तीन वर्षांची लहान मुलगी गर्दीत चेंगरू नये म्हणून तिला मी उचलून कडेवर घेतले. दहीहंडी फोडण्यासाठी ती हट्ट करत होती म्हणून तिला दहीहंडी पर्यंत नेले. दहीहंडीचा कार्यक्रम संपला आणि त्या मुलांना माझ्या हस्ते खाऊवाटप सुरू केले. तेव्हा मला कळले की ३ ते ५ वयोगटातील ही ४० मुले एडस्ग्रस्त आहेत. प्रथमच एडस्ग्रस्त निष्पाप बाल्य पाहिले. त्यांचे आयुष्य वाढविण्यासाठी या विभागातर्फे काम करायचे मनाशी ठरविले. या मुलांचा काय दोष? त्यांच्या आई-वडिलांच्या चुकीची शिक्षा भोगणे त्यांच्या नशिबी आहे.

आई-वडिलांच्या कृत्याची शिक्षा भोगणारी ती मुले डोळ्यासमोरून जाईनात. त्यांना परत निरोगी आयुष्य मिळणारच नाही मग निदान त्यांच्यासाठी जे करता येईल ते तरी करावे. या मुलांना औषधे जरी फुकट मिळणार असली तरी तपासण्या, कपडे, पुस्तके, शाळेची फी हा खर्च असतोच. प्रांतपालांनी निर्णय घेतला की या मुलांना आर्थिकदृष्ट्या दत्तक घ्यायचे. त्यांचा वर्षाचा १० हजार रूपयांपर्यंतचा खर्च संस्थेला द्यावा. अशी २४ ते २५ मुलं लायन्स क्लबने दत्तक घेतली.

पुण्यातील एडस् अवेअरनेससाठी काम करणाऱ्या काही संस्था (एनजीओ) आमच्या बरोबर आल्या व दोघांच्या संयुक्त प्रयत्नाने एडस्अवेअरनेसचे काम जोमाने सुरू झाले.

गणेशोत्सव, नवरात्रोत्सव या कालावधीत जनजागृती करणारे अनेक फलक मुख्य रस्त्यांवर लावण्यात आले. एका एन जी ओ ची प्रवासी बस पूर्णपणे जन जागृतीच्या माहितीने रंगवून पुढील तीन वर्षे महाराष्ट्रातील खेडोपाड्यात फिरवण्याची योजना कार्यान्वित झाली.

जनजागरणासाठी अनेक ठिकाणी पदयात्रा, प्रदर्शने यांचे आयोजन केले. कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी एडस् विषयावरील पथनाट्यांच्या स्पर्धा घेतल्या. भीमथडीच्या प्रदर्शनात एडस् अवेअरनेसच्या कार्यासाठी एक स्टॉल विनामूल्य मिळाला. या प्रदर्शनात सहा ते सात लाख लोकांनी या विषयाची माहिती घेतली. खासदार सुप्रिया सुळे यांनी स्टॉलला भेट देऊन कार्याला शुभेच्छा दिल्या. याच प्रदर्शनात एक गृहस्थ आपल्या पुतणीची समस्या घेऊन आले. एडस्मुळे त्या मुलीचे आई वडिल गेले व ही मुलगी एच आय व्ही पॉझिटिव्ह झाली. या मुलीची सोय आश्रमात केली.

घराबाहेर समाजातील या समस्या मन अस्वस्थ करतात. अजूनही झोपेतून दचकून जागा होतो या मुलांचे चेहरे आठवून. अजूनही कानात पुतणीसाठी आक्रोश करणाऱ्या त्या काका काकूंचे आवाज घुमतात.

हे सर्व कोठेतरी थांबलेच पाहिजे. ते थांबवणे एकट्या दुकट्याचे काम नव्हे, त्यासाठी निवृत्तीनंतर प्रत्येकाने या कार्यासाठी थोडाजरी वेळा दिला तरी आपण या समस्येला दूर करण्याचा यशस्वी प्रयत्न करू शकू. मला वाटते हजार प्रवचनांचे, तीर्थयात्रेचे पुण्य, छंद जोपासण्यातून मिळणारा आनंद हे सर्व अशा प्रकारच्या कार्यामुळे आपल्याला मिळणार आहे म्हणूनच माझे ध्येय नक्की झाले - आपले काय ?

**- श्री.श्रीकांत पांडुरंग तरडे,** पुणे
दूरध्वनी - २५४३१९२०, भ्रमणध्वनी - ९४२२३१९५५२.

## असं जगावं

कुणाच्या कधी न येता आडवं
कुवतीनुसार उत्साहानं चालावं
गरजेनुसार काळवेळ जाणून
मोजकंच रुचणारं सौम्य बोलावं ।।१।।
निसर्गाला सकाळ संध्याकाळ
जवळ घेऊन खूप प्रेम करावं
भोवतीच्या माणसांत हसतमुखानं
मनसोक्त समाधानात डुंबावं ।।२।।
मनातले सल, अपमान, वेदना
विस्मृतीत आनंदानं बुडवाव्या
भूतकाळाचा कोळसा न उगाळता
वर्तमान हसत मुक्त भोगावा ।।३।।
काटे न बनता उमलून फुलासारखं डुलावं
सुगंधी सगळ्यासमीप फूल होऊन रहावं
न दुखावत, न कळत, असंच सदा असावं
स्नेहगंध मागं सोडून हळूच सुकून जावं ।।४।।

**- आर.जी.कडवेकर, सातारा**
दूरध्वनी : ०२१६२-२५१५७६.

## संवाद लेख स्पर्धा २००९

(स्त्री विभाग - द्वितीय पारितोषिक विजेता लेख)

## "सेवानिवृत्ती झाली - पुढे काय ?"

सेवानिवृत्ती झाली - पुढे काय ? हा प्रश्नच मला पडला नाही. मी ७ वर्षे आधी स्वेच्छानिवृत्ती V.R.S. घेतली. तसे पाहिले असता स्वेच्छानिवृत्ती घ्यायची हा ठरविण्याचा कालावधी पण फारच थोडा होता आणि त्यातून लगेच मार्च महिना असल्यामुळे पुढे काय करायचे हे ठरवायला विचार करायला वेळच नव्हता. पण माझ्यापुढे तो प्रश्न उद्‌भवला नाही. कारण एकतर माझी कुटुंबातली आर्थिक कर्तव्ये होती ती पूर्ण झाली होती व इतर जबाबदाऱ्याही राहिल्या नव्हत्या. त्यामुळे निवृत्ती नंतरचे माझे आयुष्य लोकरीचा गुंडा हळूहळू उलगडत जावा तसे माझे दिवस अलगदपणे जात होते आणि मागची वीण घट्ट बसत होती.

निवृत्तीनंतरच्या दुसऱ्या दिवसापासूनच मी माझ्या बँकेशिवायच्या आयुष्याला सामोरी गेले. तसे पाहिले तर एक महिनाभर आमच्या धुळे ट्रेझरी ब्रँचचे B.M. मला कामासाठी विशेषत: P रिपोर्ट आणि स्टेटमेंटस्‌साठी बोलवित असत. 'मॅडम ५ मिनिटांकरता येऊन जा' म्हणायचे आणि माझा सगळा दिवसच कामात जायचा. पण ज्या बँकेने रोजीरोटी दिली तिचे काम करणे आवश्यकच होते.

४/५ दिवसांनी धुळे आकाशवाणीचे प्रसिद्धी अधिकारी मला भेटले आणि म्हणाले, 'आता तुम्ही आमच्याकडे casual म्हणून या' पण मला जर नोकरीच करायची असती तर मी बँक का सोडली असती ? तशी मी महिन्या दोन महिन्यांनी आकाशवाणीवर 'स्त्री सखी' या सदरात १९९३ पासून कार्यक्रम करायची. त्यासाठी वाचन लिखाण हे माझे आवडते काम असायचे.

नोकरीमुळे घरच्या आर्थिक समस्या आणि आपली कर्तव्ये ही सगळी पार पडली होती. परंतु माझे छंद, आवड ह्याला मुरड घातलेली होती ती उसवायची ठरवली. मला विणकाम, भरतकाम, ड्रॉईंग, बेकींग आणि डिटेक्टीव्ह पुस्तके वाचणे हे फार मनापासून आवडायचे. म्हणून मी आधी माझ्या मनाप्रमाणे वाचन केले. काही फ्रेमस्‌ भरल्या, रंगवल्या. काही विणकाम केले. तसेच Glass Paintings केले. नंतर खूप प्रकारच्या मातीच्या फ्लॉवरपॉटस्‌वर रंगकाम आणि सिरॅमिकने काम केले. मोठी मोठी म्हणजे 4' x 3', 4' x 4' च्या आकारातील सिरॅमिक painting & working च्या फ्रेम्स बनविल्या. मग भगिनीवर्गाच्या आग्रहास्तव वरील सर्वांचे ना नफा ना तोटा या तत्त्वावर क्लासेस सुरू केले. त्यामुळे माझा दिवस खूपच गडबडीचा/गर्दीचा जात असे. त्यामुळे मला संध्याकाळपर्यंत कधी T.V. लावावा लागला नाही. हे सगळे व्यक्तिगत झाले.

मला समाजसेवेची पण आवड आहे. पण कोणावरही ओझं/बोजा लावायचा नाही. बळजबरी करायची नाही. मला आनंदी, उत्साही वातावरण ठेवायला आवडते म्हणून मग ती पुण्याला सारस बागेत आणि मुंबईच्या खुद्द डॉ.मदन कटारिया (भारतातील पहिले हास्यक्लब चालू करणारे) यांच्याकडून हास्यप्रकार शिकले. त्याचा फायदा परिणाम काय वगैरे सर्व माहिती करून घेतली आणि १३ मे २००१ ला मी रहात होते त्या सोसायटीच्या मोकळ्या जागेत हास्यक्लब चालू केला. उद्‌घाटन केले होते माझ्या भावजयीने, जी नाशिकला हास्यक्लब घेत असे. प्रतिसादही चांगला मिळाला. हा हास्ययोग मी फक्त स्त्रियांकरताच घेत होते. धुळ्यामध्ये हा पहिलाच हास्ययोग होता. येणाऱ्या भगिनींना काहीजण 'काय हाऽ हाऽ करायला जाता' म्हणून हिणवायचे, काही भगिनींना बोलावल्यास त्या म्हणायच्या, आम्हाला त्याची गरज नाही. आम्ही दिवसभरात खूप हसतो. असो. पण अखेरीस कमीजास्त होत ६०/७० च्यावर भगिनी जमायला लागल्या.

तशी मी १९७५ पासून योगा करतच होते. १९७५ साली नासिक ट्रेनिंग सेंटरला Ladies बॅच होती. त्यावेळी श्री. साठे सर चीफ 'इन्स्ट्रक्टर' होते. त्यांनी 'योग विद्याधाम'चे संस्थापक श्री.मंडलिकसर, यांना बोलावले होते आणि बॅचला श्री मंडलिकसर रोज येऊन योग शिकवित असत. तेव्हापासूनच माझे घरी योगासने करणे चालू होते. मी नंतर योगशिक्षिका झाले आणि हास्य क्लबमध्ये योगशिक्षणही चालू केले. त्याचा भगिनी वर्गाला शारीरिकदृष्ट्या खूप फायदा झाला. त्यामुळे त्यांच्या घरातील वातावरण बदलले. उत्साहित झाले. घरातील तीच तीच कंटाळवाणी कामे त्या उत्साहाने करायला लागल्या हे त्यांनीच सांगितले. कोणाकोणाच्या पाठीत, कमरेत, मानेत रोज नित्य नवीन उसण/लचक भरायची ती बंद झाली. कोणाकोणाचे B.P. नॉर्मल झाले, दम लागणे कमी झाले, काहींचा दमा पूर्ण गेला. महत्त्वाचे म्हणजे नकारात्मक दृष्टिकोन जाऊन सकारात्मक दृष्टिकोन आला, एककल्लीपणा गेला.

प्रत्येकाच्यात सुप्त गुण असतोच. मग मी नाटक, पथनाट्य माझ्या हास्ययोगाच्या भगिनींकडून करून घेतले. त्यात त्यांचे चांगले सहकार्य लाभले. काहींचे उच्चार, काहींना स्टेज डेअरिंग नव्हते ते आले. आम्ही गेल्यावर्षी पहाट पाडव्यात पण कार्यक्रम केला होता. महत्त्वाचे म्हणजे त्यांच्यात आत्मविश्वास आला. भगिनींच्या घरची माणसे माझ्याकडे येऊन मोकळ्या मनाने माझे आभार मानीत आणि म्हणत आमचे घर तुमच्यामुळे सुधारले, उत्साहित झाले बघा. हे सर्व पाहून, ऐकून मला फार समाधान वाटते. आपण काहीतरी केल्याचे चीज झाले. समाजाचे थोडेतरी ऋण फेडू शकतो.

तशीच आणखी जवळजवळ १०० च्या वर भगिनी सभासद असलेल्या एक हास्ययोगाची बॅच पण टॉवर बगिच्यात सुरू केली. त्यात अभिमानाने सांगायचे म्हणजे मी मे २००८ ला धुळ्याहून

नाशिकला शिफ्ट झाले तरी वरील हास्ययोग वर्ग अजूनही धुळ्याला चालू आहेत. शिवाय आता मेंबरही वाढले आहेत.

आता मी नाशिकला ज्या भागात रहाते तेथेपण हास्ययोग वर्ग चालू केला आहे. २०/२२ जणी येतात पण मला खात्री आहे की इथेपण चांगला प्रतिसाद मिळेल.

धुळ्याला असताना मी नवरात्र, गणेश उत्सव, गणेश जयंतीला आसपासच्या व हास्ययोगाच्या भगिनींना एकत्र करून श्रीसूक्तपाठ, गणपती अथर्वशीर्ष आवर्तने करायचो. नाशिकला आल्यावर पण आमच्या अपार्टमेंट मधील भगिनींना एकत्र करून श्रीसूक्त पाठ, गणपती अथर्वशीर्ष मी शिकवते. ते म्हटल्याने होणारे फायदे त्यांना समजावून दिलेत आणि त्यांना ते पटल्यामुळे प्रतिसादही चांगला मिळाला.

मी ETV वर मेजवानी परिपूर्ण किचनवर दोन रेसिपिज २२-१-२००९ ला करून आले. ही माझी आवडपण मला जपायला मिळाली.

नाशिक आकाशवाणी FM वर पण श्री. उत्तम कोळगावकर मुख्य अधिकारी ह्यांच्यामुळे मला संधी मिळाली.

देवाच्या कृपेमुळे आणि बँकेमुळे आर्थिकदृष्ट्या चांगले असल्याने आम्ही दरवर्षी फिरायला, देवदेव करायला जाऊ शकतो आणि जातो. आत्ताच परवा २२ दिवसांची बसने नर्मदा परिक्रमा करून आम्ही व्यवस्थित आलो. आता कैलास, मानस सरोवराला जायचा मानस आहे.

नातेवाईकात, ओळखिच्यात, विवाह ठरवण्याचे, जुळवण्याचे काम पण माझ्या आवडीचे आहे. अशा तऱ्हेने माझे सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य हवाहव्याशा धावपळीत जात आहे.

लोकमत सखीमंच, संस्कार भारती, राष्ट्र सेवा समितीची मी सभासद आहे. त्यांच्याही कार्यक्रमाला मी हजर रहात असते आणि त्यात सक्रिय सहभागही घेत असते. लोकमत सखीमंचच्या दर महिन्याला स्पर्धा होतात तर २ वर्षापूर्वीच्या वर्षातल्या १२ ही महिन्यातल्या स्पर्धेत प्रथम क्रमांक्ते उत्तेजनार्थ ह्यात माझा नंबर लागला होता. तसेच संस्कार भारतीच्या रांगोळ्या व मोठमोठ्या पोस्टर रांगोळ्या ह्यांचे पण मी क्लासेस घेते. मी समितीच्या घोषात वंशी (बासरी) शिकून भाग घेतला होता.

ह्या सर्वांमळे एक मात्र होते ते म्हणजे आपण समाजात मिसळून राहतो. एककल्ली किंवा स्वत:भोवती विशिष्ट कोष विणला जात नाही आणि आपल्याला काहीतरी creative work करायचे असल्याने स्फुरण येते. आणि हेच नेमके मला मिळते.

जरी माझी स्वेच्छा सेवानिवृत्ती, काही विचार करण्याला अवधी न मिळता मी घेतली असली तरी निवृत्ती नंतर काय ? हा प्रश्न मात्र मला कधीच पडला नाही.

- **सौ.मनिषा दिलीप कुळकर्णी,** नासिक
भ्रमणध्वनी - ९८५००७८४५४

# पावसा, कधी रे येशिल तू ?

नेमेचि येतो पावसाळा
आज ह्यावेळी कां रूसलास तू ?
कधी रे येशिल तू ?
पावसा, कधी रे येशिल तू ?।।धृ. ।।

सवय तुझी नित्याची होती
क्षिती आम्हा नव्हतीच कधीही
ह्यावेळी गाफील ठेवले आम्हास तू
कधी रे येशिल तू ? ।।१।।

खोटे पाडले तू हवामान खात्या
अपमान केला ज्योतिषांचा
एवढा कां आडमुठा झालास तू ?
कधी रे येशिल तू ? ।।२।।

धरणात नाही कोठेही पाणी
म्हणूनी तुझी करीतो आळवणी
रप-रप, धो-धो कधी पडणार तू ?
कधी रे येशिल तू ।।३।।

पुण्या-मुंबईची माणसे आम्ही
पाणीपती-हीच आमची होती श्रीमंती
क्षणात माज उतरविलास आमचा तू
कधी रे येशिल तू ? ।।४।।

सकाळ-संध्याकाळ सदैव नळाला पाणी
आता मात्र एकदिवसाआड पाणी
अशी कां क्रूर चेष्टा आमची करतोस तू ?
कधी रे येशिल तू ? ।।५।।

जून महिना गेला कोरडा
आषाढामध्येही केलास तू खाडा
आर्त आळवणी पड पड पावसा तू
कधी रे येशिल तू ? ।।६।।

नम्र प्रार्थना तुला पावसा
नको धन नको संपदा
फक्त पाहिजेस आमच्या जीवना तू
कधी रे येशिल तू ..... ?
पावसा, कधी रे येशिल तू ? ।।७।।

- **शरद शिंगवेकर**, पुणे
भ्रमणध्वनी : ९३७०९८८६८२

## संवाद लेख स्पर्धा २००९

(पुरुष विभाग - तृतीय पारितोषिक विजेता लेख)

## ''सेवानिवृत्ती झाली - पुढे काय ?''

मानवी जीवनाच्या तीन अवस्था आहेत. बालपण, तारुण्य आणि निवृत्ती. प्रत्येकाला जीवनाच्या ह्या चाकोरीतून जाणे अपरिहार्य असते. बालपण रम्य असते. चिंता नाही, काळजी नाही. बागडणे, चिवचिवणे, भातुकलीचा खेळ त्यांची दुनियाच वेगळी ! शिवाय बालपण म्हणजे अपरिहार्यपणे आठवते ती शाळा, शाळेतील सवंगडी, तेव्हाच्या गमती जमती. काळ कसा गेला हे कळतच नाही. "Heaven lies about us in our infancy" असे उगीचच नाही म्हटले. हळूहळू वय वाढत जाते आणि तारुण्यात वसंत ऋतू म्हणतात. हा उमेदीचा काळ असतो. रक्त सळसळते, अंगात ऊर्जा असते, उत्साह असतो. बंडखोरी, पराक्रम, जिद्द, शृंगार ही तारुण्याची खास वैशिष्ट्ये. कर्तृत्वाने, पुरुषार्थाने जगाला दिपविण्याचा हा काळ. "The days of our youth are the days of our glory" असे बायरनने म्हटले आहे. बघता बघता तारुण्य ओसरते आणि माणसाला लागते चाहूल निवृत्तीची. निवृत्ती म्हणजे आयुष्याचा शेवटचा अध्याय. A final chapter of life.

आचार्य अत्रे म्हणतात, ''बाई जेव्हा चार्मलेस होते आणि पुरुष हार्मलेस होतो तेव्हा ते निवृत्त झाले असे समजावे.'' निवृत्तीनंतर माणूस शरीराने, मनाने थकून गेलेला असतो. वेळ कस घालवावा असा प्रश्न पडतो. वेळ जाता जात नाही. रिकामपणामुळे जीवन एकाकी होते. त्यामुळे नैराश्य येते. शारीरिक-मानसिक संतुलन रहात नाही. खरंतर निवृत्तीनंतरचा काळ तसा वाईट नाही. जीवन संपण्याची ती खूण असली तरी आपण आयुष्य बघितलेले असते. बऱ्या-वाईट अनुभवाची शिदोरी आपल्या जवळ असते. जगाचे व्यवहार कळलेले असतात, चांगल्या-वाईटाची जाणीव झालेली असते. त्यामुळे निवृत्तीनंतरच्या काळाला घाबरण्याची जरूरी नाही. माध्यान्हीचा सूर्य जसा संपूर्ण ब्रह्मांडाला तापवितो पण संध्याकाळी त्याचा ताप सौम्य होतो अगदी तसेच जीवनसंध्येत आहे.

एका विचारवंताने सांगितले आहे की उपजीविकेसाठी आवश्यक असणाऱ्या विषयाचं शिक्षण जरूर घ्या. पोटापाण्याचा उद्योग जिद्दीने करा. पण एवढ्यावरच थांबू नका. साहित्य, वाचन, चित्र, संगीत, नाट्य, शिल्प-खेळ ह्यातील एखाद्यातरी कलेशी मैत्री जमवा. पोटापाण्याचा उद्योग तुम्हाला जगवील पण कलेशी केलेली मैत्री तुम्ही कां जगायचं हे सांगून जाईल. जग सुंदर आहे, अनमोल आहे. कलेमुळे ते अधिक सुंदर होईल. जीवन जगणं ही कला आहे. ही कला अवगत झाली तर निवृत्तीनंतर काय हा प्रश्न उद्भवणार नाही.

निवृत्तीनंतर संसाराच्या जबाबदाऱ्या संपलेल्या असतात. मुलेबाळे आपल्या संसारात रममाण झालेली असतात. तेव्हा वर्षातून १/२ वेळा देवदर्शन, निसर्गदर्शनासाठी प्रवास करावा. तीर्थयात्रेला आपल्या संस्कृतीत महत्त्वाचे स्थान आहे. जन्मास यावे आणि काशीस जावे असे म्हणतात. प्रवासातून नेत्रसुख तर मिळतेच पण मनावरचे दडपण कमी होते. रोजच्या चाकोरीबद्ध जीवनातून विरंगुळा मिळतो. चंद्रप्रकाशात सागर किनाऱ्यावरून भ्रमंती करताना आपण अंतर्मुख होतो. थंड हवेची ठिकाणे, तीर्थक्षेत्रे, मानवनिर्मित वस्तुसंग्रहालये, जुने राजवाडे-किल्ले, प्रचंड धरणं, नव्या जगातील चमत्कार पाहिले म्हणजे मनाला समाधान मिळते. दाही दिशांना आनंद भरून राहिलेला आहे याची जाणीव होते. जीवनावर प्रेम करणाऱ्या माणसाला निवृत्तीनंतर प्रवास ही पर्वणी आहे.

निवृत्तीनंतर कंटाळवाण्या आणि एकाकी जीवनातून कुठे थोडासा दिलासा आणि विसावा मिळत असेल तर तो वाचण्याच्या छंदातून. 'ग्रंथ हेच गुरू' असं म्हणतात. वाचनामुळे सर्वांगीण ज्ञान मिळते, बुद्धी प्रगल्भ होते त्याचबरोबर माणूस क्षणभर स्वप्नाच्या जगात जाऊन वास्तव दुःखे विसरून जातो. 'ठेविले अनंते तैसेचि राहावे, चित्ती असू द्यावे समाधान' ही संतांची शिकवण ग्रंथवाचनातूनच मिळते. Books are best friends हेच खरे. पुस्तके म्हणजे मनाला आनंद देणारे अखंड झरेच. A realm of gold. शरीराला, मनाला आधार देणाऱ्या विपुल साहित्यसंपदेचा आस्वाद घेत निवृत्तीचा आनंद लुटावा.

निवृत्तीनंतर रोज काही वेळ नातवंडे आणि सहचारिणीबरोबर घालवावा. नातवंडे म्हणजे कोण ? बँकेच्या भाषेत आपला मुलगा म्हणजे मुद्दल आणि नातवंडे म्हणजे व्याज आणि माणूस मुद्दलापेक्षा व्याजावर जास्त प्रेम करतो. नातवंडाच्या निरागस, निष्पाप लीलेतून आपल्याला अपरिमित आनंद मिळतो. त्यांच्या बाललीलांत आपण आपले हरवलेले बालपण शोधण्याचा प्रयत्न करावा. त्यांना रोज जीवनाची ABC शिकवावी, त्यांच्याबरोबर 'शुभं करोती....' म्हणतच कसा वेळ जातो हे कळतच नाही. रोज काही वेळ सहचारिणीबरोबर घालवावा. आत्तापर्यंतच्या धावपळीच्या, धकाधकीच्या जीवनात कदाचित तुमच्याकडे पुरेसा वेळ नव्हता. आता मात्र भरपूर वेळ आहे. आयुष्याच्या सुखदुःखाची ती सहप्रवासिनी आहे, साताजन्माची सोबतीण आहे. आयुष्याची ही Second Inning एकमेकांच्या सहवासात घालवून हितगूज करावे म्हणजे नात्यातील गोडवा वृद्धिंगत होईल, आयुष्यातील उर्वरित क्षण आनंदाने जातील.

निवृत्तीनंतर चाहूल लागते म्हातारपणाची, ती आयुष्याची शेवटची वाटचाल. ह्याचवेळी नेत्रदान, किडनीदान करण्याचा संकल्प करून सामाजिक ऋण फेडण्याची संधी मिळू शकते.

मृत्यूनंतर 'सखे सोयरे डोळे पुसतील, पुन्हा आपुल्या कामी लागतील,' आणि काही काळाने विसरून जातील. परंतु नेत्रदानामुळे अंधाला दृष्टी लाभल्यामुळे तो हे सुंदर जग पाहू शकेल, किडनी निकामी झालेल्यास किडनी मिळाली तर त्याला नवजीवन मिळेल. हे सर्व रोगी आयुष्यभर तुमचे ऋणी राहतील आणि हा संकल्प तुम्हाला सामाजिक ऋण फेडण्याचे समाधान देईन, तुमचे जीवन कृतार्थ होईल.

थोडक्यात निवृत्तीनंतर चांगले जगण्यासाठीच्या Healthy tips for wealthy ageing म्हणजे रोज मानवेल तेवढा व्यायाम. योगा प्राणायाम करणे. सत्संग, ईश्वर सेवा, ध्यानधारणा करणे, छंद जोपासणे, मुलाबाळांच्या संसारात ढवळाढवळ न करता जरूर तेथेच मार्गदर्शन करणे, समविचारी लोकांचा ग्रुप जमवून मनमुराद थट्टा विनोद करून काही वेळा भजन कीर्तन, वनभोजन, सहलीचे आयोजन, गत काळातील आठवणी, जुन्या स्मृतींना उजाळा देणे म्हणजे ''येईल का रे काळ ऐसा दिव्यतेचा। द्याया सौख्य पुन्हा ! ।।'' अशा ओळी मनात येऊन आनंदाला उधाण येईल. आपले आरोग्य आणि पैसा सांभाळून मनाची गुंतवणूक चांगल्या प्रकारे केली तर जीवन सुखकर होते, मन प्रसन्न राहते. एका कवीने म्हटले आहे -

''वय झालं म्हणून थकायचं कशाला,
आयुष्याच्या आनंदाला मुकायचं कशाला ? ''

शेवटी निवृत्तीनंतर आयुष्याची सांगाता अखेर कशी व कोठे होईल ते मात्र अतर्क्य व अगम्य आहे. एक गोष्ट लक्षात ठेवावी की आयुष्याचे शेवटचे पान नियती लिहिते. त्यामुळे जो पर्यंत विधाता नावाच्या आदिशक्तीकडून तुम्हाला अखेरचे आमंत्रण येत नाही तोपर्यंत जीवन आवडो न आवडो आपल्याला जगावेच लागते. ''जीना यहाँ मरना यहाँ, इसके सिवा जाना कहाँ ! '' जगायचेच तर आनंदाने, समाधानाने का जगू नये ? शरीराने निवृत्त झालो तरी मन निवृत्त न होऊ देता जीवनाचा आस्वाद घ्यावा असं म्हणतात -

''हाती नाही येणे, हाती नाही जाणे
हसत जगावे हसत मरावे हेच खरे जीवन गाणे''

निसर्गाकडून आपल्याला बोध घेता येईल. जवळ काटे असले तरी गुलाबाचे फूल उमलतेच, चिखलात राहून कमळ बहरतेच. रांगोळी विस्कटणार असते तरी तिच्यात रंग भरावयाचे असतात, फुले कोमेजणार असतात तरी सुगंधात हरवायचे असते, मृत्यू अटळ असला तरी आनंदाने जीवन फुलवायचे असते. मृत्यूला आनंदाने कवटाळावे, सुखदुःखांनी भरलेल्या पावलांनी अखेरची वाटचाल करावी. ना खंत, ना खेद अशा मनाने या वाटचालीत संथ, शांत अखेरचे पाऊल टाकावे !

**- मदनलाल काबरा, जळगाव**
भ्रमणध्वनी - ९७३०५५०४१०

## स्व. राम शेवाळकरांना विनम्र अभिवादन
## (मृत्यू दि.०३.०५.०९)

ज्ञानयोगी, कर्मयोगी, स्नेहांकित 'राम'
प्रतिभावंत 'शेवाळकर' असे तयाचे नाम ।
विद्या-व्यासंगी, तो सरस्वती-पुत्र थोर
पंचतत्त्वी विलीन झाला, विदर्भाचा 'कोहिनूर' ।।१।।
शब्दकुबेर तो, भाषाप्रभू ठरला
अढळपद ध्रुवाचे, लाभे तयाला ।
विद्वत्तेच्या दिव्यस्पर्शे, ज्ञानवंत झाला
वक्ता दशसहस्रेषु, लोकमान्य पावला ।।२।।
तेज प्रतिभेचे, सप्तमहर्षीचे,
सामर्थ्य वाणीत, विद्या-वाचस्पतीचे ।
धन सुविचारांचे, अमृतकुंभी वेचले
शरद चांदण्यासम, मुक्तहस्ते वाटले ।।३।।
तृप्त, समाधानी जीवन तो जगला
वैभवात अहंकार, निग्रहे त्यागला ।
सुगंध सौजन्याचा, जीवनभर उधळला ।
वियोगे तयाच्या, रसिक श्रोता हळहळला ।।४।।
देह सत्कारणी, कणकण झिजविला
क्षणक्षण आयुष्याचा, मांगल्यास्तव वेचला ।
स्नेहबंध, ऋणानुबंध, अतिकोमल जपले
माणुसकीच्या सुगंधाने, आसमंत व्यापले ।।५।।
विवेकी, सदाचारी; पूज्य तो महर्षी
देववाणीच्या प्रसादे, दिगंत लाभे कीर्ती ।
निरामय आनंद पेरूनी, राजहंस विसावला
अभिवादन विनम्र, सौजन्यमर्ती पुरुषोत्तमाला ।।६।।

**- पी.बी.भेंडे,** पुसद
दूरध्वनी - ०७२३३-२४९६१२

## निवेदन

**स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स स्नेहमंडळ, पुणे**

आपल्या स्नेहमंडळातर्फे 'वैष्णवी असोसिएशन फॉर द ब्लाईंड' पुणे यांच्या अंध युवकांचा 'सूर सरगम सूराली' हा हिंदी आणि मराठी गाण्यांचा बहारदार कार्यक्रम आयोजित केला आहे. तरी सर्व सभासदांनी याचा अवश्य लाभ घ्यावा

**स्थळ : भरत नाट्य मंदिर, सदाशिव पेठ, पुणे.**
**दिनांक : ३० जुलै २००९, वार : गुरूवार**
**वेळ : सायंकाळी ५ वाजता**

वर्ष २००९ ची वर्गणी (रू.१५०/-) जमा करण्याची व्यवस्था थिएटरवर करण्यात आली आहे.

**- सेक्रेटरी**
स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स स्नेहमंडळ, पुणे

# संवाद लेख स्पर्धा २००९

(स्त्री विभाग - तृतीय पारितोषिक विजेता लेख)

## ''सेवानिवृत्ती झाली - पुढे काय ?''

३० जून २००२. माझा बँकविश्वाचा काम करण्याचा शेवटचा दिवस. घरीदारी सगळीकडून विरोध असताना माझा ठाम निर्णय होता तो. निवृत्तीचा. स्वेच्छानिवृत्ती योजनेत संधी लाभली नाही वयाच्या अटीमुळे (सर्वांचा विरोध ह्यासाठीच) माझा पिंड भावनेशी निगडीत. स्वप्नावर जगणारा, अन् जगताना त्या स्वप्नपूर्तीसाठी जीव तोडून धावणारा.

कळत्या वयाच्या पदार्पणातच. 'अमृतवेल' वि.स.खांडेकरांच्या कादंबरीने भारावलेला.

''भग्न स्वप्नांच्या तुकड्यांना कवटाळून बसण्यासाठी मनुष्य जन्माला आला नाही. मानवाचे मन फक्त भूतकाळाच्या साखळदंडानी बांधून ठेवता येत नाही, त्याला भविष्यकाळाच्या गरूडपंखाचे वरदानही लाभले आहे. एखादं स्वप्न पहाणं, ते फुलवित जाणं, ते सत्यसृष्टीत उतरावं म्हणून धडपडणं, त्या धडपडीतला आनंद लुटणं आणि दुर्दैवाने ते स्वप्न भंग पावलं तरी त्याच्या तुकड्यावरून रक्ताळलेल्या पायांनी दुसऱ्या स्वप्नामागे धावणं हा मानवी धर्म आहे. मनुष्याच्या जीवनाला अर्थ येतो तो यामुळेच !''

भावविभोर होऊन नोकरी सोडली. त्यासाठी कारण होतं तेही स्वत:ची सुंदर स्वप्न जगण्यासाठीचे. नोकरी काळाची गरज होती. माझ्या गरजा भागवणारी सार्थ मायमाऊली लाभली तीही, 'स्टेट बँक'. तिच्याबरोबरच्या वाटचालीत मी, तिच्यासाठीच्या कर्तव्यांना जागले, तिने मला भरभरून दिले. समाजात ताठ मानेने जगण्याचा सन्मान अन् तारुण्यातील स्वप्नांचे पंखातील बळ. त्या ऋणातून कधीच मुक्त होणे नाही अशा जड अंतकरणाने तिचा निरोप घेतला.

पुढे काय ? हा प्रश्न कधी प्रश्नच नव्हता माझ्यासाठी. नोकरी करताना एक मोठी कसरत आम्ही स्त्रिया करीत असतो. (हे माझे वैयक्तिक मत असू शकते.) माझ्या गोजिरवाण्या बाळांसाठी त्याचं बालपण, वाढणं, फुलणं, बहरणं, अशा हव्याहव्याशा क्षणांना परिस्थितीने मुकले. पहिलं पाऊल, पहिला बोल असे कितीतरी क्षण. आता माझ्या हातात होता माझा वेळ. मी हा वेळ मला हवा तसा वापरणार होते. माझ्या दोन बछड्यांसाठी. आजपर्यंत ही संसारवेल बहरतांना पाहिली. आता तिची निगराणी राखण्यास वेळेचे बंधन नव्हते. मुलं म्हणतील तसा, तेवढा वेळ त्यांचा, घरच्यांचा, साऱ्यांचाच आणि हो माझ्या आवडीनिवडींचा, छंदाचाही. माझी निवृत्ती एका योग्य वळणावर मला लाभली होती. आमचा दाद्या पंखात बळ घेऊन उडण्यास सज्ज होता. छोटी अजून शालेय जीवनात रमलेली. दोघंही गुणसंपन्न. तिचा अभ्यास, उपक्रमशील कृती. माझी सामाजिक बांधीलकी असा मस्त मेळ. राहिलेलं भरपूर वाचन, मस्त संगीताचा आस्वाद, रेडिओ, टेप, चित्रकलेतील रंगांची उधळण, भटकंती. एक ना अनेक.

निवृत्तीच्या पहिल्याच वर्षी लेकीबरोबर (ती ९वीत) ड्राईंगची इंटरमिडिअेट परीक्षा दिली. दोघींनाही 'बी'ग्रेड मिळाली. माझ्यासारखी परीक्षार्थी पाहून सारा वर्ग अचंबेने पहाणारा. माझ्यासाठी एक आव्हानच होतं ते. शालेय जीवनानंतर ज्याला मी ३०-३५ वर्षांनी सामोरी गेले. लेकीच्या शाळेत पालक-शिक्षक सभेचे काम पहात होतेच. पण आता त्यामध्ये विशेष सहभाग देऊ शकत होते. ह्याचे अध्यक्षपद स्वीकारले. ह्यासाठी अनेक उपक्रम राबवले. वाचनसंस्कृती, अक्षरसुधार, ८ वी ते १० वी साठी सेमीइंग्रजी, निरनिराळ्या स्पर्धा, गणेशचतुर्थीनिमित्त व्याख्यानमाला इ. निरनिराळ्या प्रदर्शनास भेटी, माजी विद्यार्थीनी ज्यांनी उत्तुंग यश संपादन केलंय, त्यांना आमंत्रित केले. ज्यामुळे एक वेगळी प्रेरणा लाभावी.

असं सारं करण्यास माझा उत्साहाचा धबधबा ओसंडून वाहात असायचा. पेन्शनर्सवयाची खरीखुरी बांधीलकीही नव्हती. नियमानुसार वयाच्या ५८/६० व्या वर्षी असणारी निवृत्ती चक्क ४८ व्या वर्षी स्वीकारली होती. शरीराची उत्तम साथ होती. पहिल्याच सहा महिन्यात फक्त मैत्रिणीच मिळून बद्रीनाथ, फुलों की घाटी (Valley of flowers), हरिद्वार अशी भटकंती केली.

ज्या कर्मभूमीत (स्टेट बँक परिवारात) मस्त २५ वर्षे घालवली होती तेथे पुन्हा पुन्हा जात रहावं, भेटावं अशा मैत्रिणी सहाध्यायी होतेच. अशी आपसुकच पावलं तिकडे वळायची. सर्वजण हरकून जायचे. म्हणायचे, तुझा निवृत्तीचा उत्साह ओसंडून वाहाताना जाणवतोय बरं कां ? हेवा वाटतो तुझा. त्यांच्या ह्या प्रतिक्रियेने मन तृप्त व्हायचे.

आणि, अचानक..... 'उष:काल होता होता काळ रात्र आली.....' ४ मे २००४ ची सकाळ आमचं आयुष्य उध्वस्त करून गेली. क्षणात होत्याचं नव्हतं झालं. आमचा राजस सुकुमार बेभान धावणाऱ्या बेजबाबदार वाहनअपघाताचा बळी ठरला. काळच थांबला आमच्यासाठी. आज ५ वर्षे होतील. सावरणं म्हणजे काय असतं, ते कळलंच नाहीये. आयुष्याचे कालचक्र कुठे थांबलंय पण ? मनावर दगड ठेवून भग्न स्वप्नाच्या तुकड्यांवरून रक्ताळलेल्या पायांनी चालायचेच आहे. (दुसऱ्या स्वप्नपूर्तीसाठी. आमच्या छोटूलीसाठी.) त्या नियतीकर्त्यास कळकळीची हाक देत की बाबा रे, राहील ते कर्म पूर्ण करून दे, सुसह्य होऊ दे. त्यासाठी हातून व्हावं फक्त सत्कर्म, समाजहित.

दु:ख विसरावे, मागे पडावे म्हणून पुण्यात आलो. लेकीच्या स्वप्नांना साकारण्यास तिचा दादा तिला विद्येच्या नगरीत आणणार होता. ते स्वप्न पूर्ण करण्यास त्याच्या बाबांनी आयुष्यात प्रथमच स्वत:चं गाव मागे टाकलं. आजही ते त्यांना जडच जातंय.

ह्या नव्या वळणावर, नवीन उपक्रम हाती घेतले. ३१ डिसेंबर २००५ सरत्या वर्षाला निरोप द्यायचा अन् आपल्या लाडक्याच्या स्मृती जागवायच्या. आयोजन केलं रक्तदान शिबिराचं. त्याबरोबरच देहदान व नेत्रदानांचे फॉर्म्सही. यशवंतराव नाट्यगृहात 'यादमें तेरी' (हा त्याच्या आवडीचा सांगीतिक कार्यक्रम) हा भावांजली कार्यक्रम. लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ४५ रक्तदाते, २० देहदाते अन् २५ नेत्रदाते. ही त्याचीच पुण्याई म्हणून आम्ही हे करू शकलो. ह्यापुढची वाटचाल चालू आहे. इथल्या मित्रपरिवारांच्या सहकार्याने. इथे भेटली माझी बालमैत्रीण सौ.इंदू (सोमण परिवार) विजय कदम, ज्येष्ठ मंगेश तेंडूलकरजी.

तेंडूलकर सरांच्यामुळे ''अपघात व वाहतूक'' यासाठी निरनिराळ्या उपक्रमात सहभागी होता येतंय. दिवाळीतील चार दिवस 'वाहतूकविषयक जागृती'ची पत्रके वाटतो. दिवाळीच्या शुभेच्छा देतो. अपेक्षा एवढीच असते की ज्या कारणाने आम्ही दु:खाचा डोंगर सोसतोय, भोगतोय ती वेळ कुणावर कधीच न येवो. गेली तीन वर्ष हे जमलंय. पुढेही करायचं आहे.

याच कार्यात आम्हाला सहभागी करून घेतात सौ.सुनंदा व चंद्रहास जप्तीवाले. (आम्ही समदु:खी आहोत) अनाथ, निराधार मुलांसाठी सुट्टीची संस्कार शिबिरे, अनाथ, एडस्‌ग्रस्त मुलांच्या संस्थांमध्ये शिबिर, समाजातून जमा होणारे कपडे, मदतीचे हात त्यांच्यापर्यंत पोहचवणे.

अर्थपूर्ण मार्गावरून जीवनाचा प्रवास ह्यापुढेही असाच घडत राहो अशी माझी इच्छा आहे . समाजाप्रती असणाऱ्या ऋणांची उतराई. त्यात आमचाही छोटासा खारीचा वाटा असावा. सत्कर्माने मोक्षाप्रती नेणारा.

सध्या पुढची वाटचाल २६ मे २००९ पासून 'युथ क्लब' तर्फे 'सरपास' हिमालय ट्रेक - मुलगी, तिच्या मैत्रिणी, सहपरिवार. उंची समुद्रसपाटीपासून १४००० फूटापर्यंत.....

शिवाय कामांसाठी ज्या संस्थांमध्ये अवश्य जातो त्या आहेत मातोश्री वृद्धाश्रम, भूगावचे मानव्य, एकलव्य शुक्रवार पेठ, आपले घर वारजे जेथे देता येतात गोळा केलेले कपडे, देणग्या, स्टेशनरी, वाचनसाहित्य इ.इ.

''जीवन चलनेका नाम, चलते रहो सुबह शाम''

- **सौ.शशी स्वामी,** पुणे, भ्रमणध्वनी - ९४२२९८७२९९

## चारोळी

स्वच्छंदे अजि जगू बंधुनो, कुडीत जोवरि आहे प्राण ।
पिकले पानही झालो आता, केव्हाही गळेल हे पान ।
कोण आम्हाला मग पुसणार ? नसे शरीरी त्राण ।
भविष्यकाळी होइल जेव्हा पंचत्वात विलीन प्राण ।।

- **प्र.वा.केळकर,** पुणे

## सासू सून सख्य

सासवांनो, देण्यापेक्षा सुनांना सोन्याचे साज ।
फिरवा त्यांच्या पाठीवर मायेचे हात ।।
नका होऊ द्या त्यांना आठवण माहेराची ।
करतील त्या आपणावर बरसात सुखाची ।।
करा चौकशी तुम्ही त्यांच्या आई वडिल भावंडाची ।
त्याही घेतील सतत काळजी तुमच्या लेकी जावयांची ।।
करा कौतुक तुम्ही त्यांनी केलेल्या पदार्थांचे ।
त्याही घेतील कष्ट बनविण्यास पदार्थ तुमच्या आवडीचे ।।
सुनांनो, सासरी येता ठेवा सतत समोरच्याचा मान ।
मग मिरवाल तुम्ही आयुष्यभर त्याची शान ।।
झेपेल तेवढे करू द्या सासूबाईंना काम ।
नका घेऊ तुम्ही काढून त्यांचा मान ।।
नातवंडांवर आहे त्यांचा तेवढाच हक्क ।
मुरड घालण्यास शिका तुम्ही वागण्यात फक्त ।।
होईल चित्र अपरंपार वागण्याचे तुमच्या ।
पाहूनी जातील खास तोंडात बोटे अमुच्या ।।
दोघींनी मिळून ठेवा ताणतणावांपासून मुक्त घराला ।
अभिमान वाटेल तुमचा साऱ्या समाजाला ।।

- **साधना अजित धारवाडकर,** डोंबिवली
भ्रमणध्वनी - ९३२०७२६६९८

## What is Friendship

Your love is your Heart
Your heart is your Spouse
Your spouse your Future
Your future is your Destiny
Your destiny is your Ambition
Your ambition is your Aspiration
Your aspiration is your Motivation
Your motivation is your Belief
Your belief is your Peace
Your peace is your Target
Your target is your Heaven
Heaven has no fun without Friend
Hence what is FRIEND ?
Friend is - Few, Relations, In, Earth, Never, Die

- **Anil Khadilkar,** Pune
Mobile - 9850984045

## समीक्षा : 'नया जमाना'

(श्री.अशोक पांडुरंग बागूल हे आपले सभासद असून ते धुळे मुख्य शाखेतून दि.३१ जाने.०८ ला निवृत्त झाले. त्याच दिवशी त्यांचा 'नया जमाना' हा हिंदी कविता संग्रह धुळ्याच्या प्रथमेश प्रकाशनाच्या वतीने प्रसिद्ध झाला. सदर कविता संग्रहाची श्री.विजयकुमार चित्रे यांनी लिहिलेली समीक्षा पुढे देत आहोत. वानगीदाखल श्री.बागुल यांची या संग्रहातील 'नया जमाना' नावाची हिंदी कवितादेखील 'संवाद' च्या वाचकांना सादर केली आहे. श्री.अशोकजी बागूल यांचे अभिनदंन ! त्यांच्या हातून यापुढेही साहित्य सेवा घडो ही सदिच्छा. - संपादक)

हाल ही में श्री. अशोक बागुल द्वारा लिखित 'नया जमाना' काव्य संग्रह : हिंदी संस्करण पढ़ने का मौका मिला । उसमें ग्यारह कविताएँ, एक गझल तथा कुछ रूबाइयाँ है । कविताओं के शीर्षक भिन्न-भिन्न है परंतु सभी की केंद्रीय भावना एक ही है।

वर्तमान मानवी जीवन विविध समस्याओं से भरा है । उनमें से सांप्रदायिकता तथा झूठ ये दो समस्याएँ वर्तमान समय में अति तीव्रता से दिखाई देती है । मजहब के नामपर सांप्रदायिकता बढ रही है ।

हिंदु-मुस्लिम, सिख-ईसाई
हम है सब उसकी रोशनाई
सबका मालिक एक ही है ।
सारे धर्म को माना भाई भाई ।।

ईश्वर एक है । इन्सान ने अलग-अलग प्रतिमाएँ निर्माण की है । नफरत को फैलाने के बजाय भाईचारेसे इन्सानियत का नाता निर्माण किया जा सकता है इस विचार को कवि की यह पंक्तियाँ दृढ़ करती है ।

कवि की 'अनोखी मिसाल' एक ऐसी कविता है जो दौलत को छोड़कर आत्मज्ञान पानेवाले राजकुमार - जो बाद में गौतम बुद्ध के नामसे जाने गए - का उदाहरण देती है और आत्मज्ञान की महती को उजागर करती है ।

मानवी जीवन अशाश्वत है । दिन ढ़लते ही सूरज अस्ताचल की ओर प्रयाण करता है, उसी प्रकार सफलता की चोटी पर होनेवाला इन्सान पलक झपकते ही उस स्थान से गिर सकता है । अत: उसे अपने पर कभी अहं का पलडा भारी न होने देना चाहिए इस विचार को अति उत्तम प्रकार से 'मानव जीवन' इस कविता में समझाया है ।

धर्मग्रंथों से इन्सान को भाईचारेका संदेश ग्रहण करना चाहिए यह संदेश 'आजादी का एहसान । कुराण-पुराण से सीखे बंधु-भाव ।' इस पंक्ति द्वारा दिया है ।

कवि की कविताओं से प्रतीत होता है कि समाज के व्यवहार से, स्वार्थ प्रवृत्ति से कवि के मनपर गहरा आघात हुआ है और उसकी झलक हमें ''रूबाइयों'' में भी देखने को मिलती है ।

कवि की भावनाओंका यह प्रवाह कभी गीतका रूप लेकर, कभी गजल का तो कभी रूबाईयों का आकार लेकर फूट पडता है । भाषा सरल तथा उर्दू प्रचुर है । उनकी कविता की शैली गागर में सागर भरनेवाली तथा गहन आशय से भरी है । उनके मन का दर्द आसानी से समझा जा सकता है तथा उनके मन की व्याकुलता जगह-जगह पर दृग्गोचर होती है ।

कवि का संदेश है मजहब से प्रेम अपनाओ, भाईचारा रखो । अमीरी-गरीबी, सुख-दु:ख आते-जाते है । इन्सानियत एक ऐसी राह है जो एक बार अपनाने पर सच्चा इन्सान कभी गुमराह नहीं होता । अपनी कविताओं द्वारा कवि अमन का संदेश फैलाना चाहता है । वह कहता है -

सब से प्यार करो खुदाका पैगाम है
अमन ही उसका अंजाम है ।

कवि का यह प्रयास ''नया जमाना'' अवश्य सफल करेगा ऐसा हमें विश्वास है । इस विश्वास के साथ उनके इस प्रयास के लिए हम सफलता की कामना करते है ।

**- विजयकुमार चित्रे**

## 'नया जमाना'

महल दो महल बनाकर
हमे खुशियाँ मनाना है,
यही महल दो महल देखकर
आखरी वक्त रो देना है ।
कितना कमाया जिंदगी में
पूछताँ है हमसे जमाना
कितने दिलमें समाया
सोचता नही जमाना ।
बन भी पाए जहाँ के मालिक
रूला देगा ये जहाँ
दर्दको बनाए खुशी का मालिक
मुस्कूरा देगी जहाँ ।
कोई मिलता है हाथ
तो जरूर होता है राज
सच्ची मुहब्बत की लगन नही
बे-इमान आज का राज ।
चलता कारवाँ मोड लेगा
सोचा भी नही होगा खुदा
जीत गया बाजी जमाना
दुनिया से भाग निकला नाखुदा ।

**- अशोक बागूल, धुळे.** भ्रमणध्वनी- ९४२१६१७४९१

## प्रचिती स्त्री शक्तीची !

मध्यंतरी बँकेच्या वतीने कोर्ट कामासाठी बारामतीस जाण्याचा योग आला. १०/१२ वर्षांच्या अंतराने जात असल्याने गावात झालेला बदल स्पष्टपणे जाणवला. कोर्ट काम आटोपल्यावर पोटपूजेसाठी कोठे जावे याचा विचार करीत असता बेलीफ म्हणाले की बुरूड गल्लीत रत्नाक्काची घरगुती खानावळ आहे. तेथे जा. बँकेचे बरेच लोक तेथे जेवणास येतात.

जेवण झाल्यावर काऊंटरवर पैसे देतेवेळी मी सहज चौकशी केली की रत्नाक्का कोण ? तेव्हा स्वयंपाकघरातून एक चाळीशीची बाई बाहेर आली. तिला पाहताच मी १९८८ सालात पोहोचलो. त्यावेळी ही बाई आमचेकडे धुणी-भांडी करण्यात येत होती असे मला स्मरले. मी त्यांना पूर्वीची ओळख सांगितल्यावर त्यांना सर्व घटना आठवल्या. साहेब, तुम्ही त्यावेळी मला ५००/- रू. दिले होते त्यावेळी मी धुणी-भांडी करून भाजी विक्रीचा व्यवसाय करीत होते. त्यानंतर तुमच्या बँकेने मला एकात्मिक ग्रामीण विकास अंतर्गत योजनेनुसार सांडगे, पापड, लोणची वगैरे करण्यासाठी रू. ३००० चे कर्ज दिले. त्यानंतर २/३ वर्षांनी मी प्रथम छोट्या प्रमाणावर खानावळ सुरू केली आता १५/२० मेंबर आहेत. आमचा चौघांचा खर्च जाऊन महिना ४ ते ५ हजार हाती येतात. मी दिलेल्या त्या ५०० रू. पासून तिच्या कार्याचा विस्तार पाहून मी आनंदित झालो व एक स्त्री काय करू शकते याची प्रचिती आली.

– **श्री.अरविंद ल.जोशी,** सांगली.
भ्रमणध्वनी - ९३२५४१९३२५

## शूर सैनिक मी

हाती बंदूक घेऊन सीमेवर सदैव पहारा देतो मी खडा ।
देशरक्षणाच्या पवित्र कार्या जाऊ नये हातून थोडासाही तडा ।।
देशासाठी करावी लागलीच कधी कुर्बान मला माझी जान ।
माता-पित्यांना लाभू दे पुण्य देशासाठी अर्पण केल्याचे पुत्रदान ।।
धारातीर्थी पडलो मी, तर येऊ नये पाणी त्यांच्या डोळा ।
म्हणून ठेवून गेलोय मांडीवर त्यांच्या माझ्या तान्ह्या बाळा ।।
मी जाताच पत्नीच्या कपाळी उमटेल वैधव्याची छोटीसी खूण ।
त्याहून मोठे असेल पतीचे तिच्या देशासाठीचे पावन ऋण ।।
कुरवाळीत बसू नये कोणीही मज मिळालेल्या शौर्याच्या स्मृतिचिन्हा ।
धाडून द्यावे त्यांनी सीमेवर यथावकाश माझ्या पुत्रा पुन्हा ।।
वीरमरण हे नसून मरण ते तर लाखो जन्मांचे सार्थक ।
मग आप्त-स्वकीयांनी का करावा मजसाठी शोक निरर्थक ? ।।

– **सौ.शकुंतला औटी,** मुलुंड (पू.)
दूरध्वनी - ०२२-२१६३८०६२

## पाऊस

वैशाखाचा पेटे वणवा, धरती भासे जणू तापला तवा
बळीराजा घालतो साकडे,
कृपाळू पावसा लवकर ये ना रे ।।१।।
असह्य उकाडा जीव घाबरा
बिजली राणी करी पोबारा
प्रणयी जन अति व्याकुळे झाले
कृपाळू पावसा लवकर ये ना रे ।।२।।
झरा आटला सरला चारा
वॉटर टँकर एकच आसरा
गरीब विकती गुरेढोरे
कृपाळू पावसा लवकर ये ना रे ।।३।।
आला आला पाऊस आला
सर्वत्र आनंदीआनंद झाला
बळीराजा नाचे आनंदाने
पावसाची कृपा झाली रे ।।४।।
दुष्काळाचा धोका टळला
लोडशेडिंगचा बडगा हटला
शासन सोडी सुस्कारे
पावसाची कृपा झाली रे ।।५।।
तृप्त झाली धरणीमाता
चिंब भिजल्या प्रणयी जोड्या
वसुंधरा हसली सौख्यभरे
पावसाची कृपा झाली रे ।।६।।
वावरात तलाव तुडुंब भरला
पिकांचा साऱ्या सत्यानाश झाला
बळीराजा डोईला हात लावे
निर्दयी पावसा आता तरी थांब ना रे ।।७।।
झोपडपट्टीत पूर आला
गरीबांचा संसार वाहून चालला
घरात साऱ्या चिखल रे
निर्दयी पावसा आता तरी थांब ना रे ।।८।।
धरणाला धोका पाणी सोडा
अलमट्टी आणी पाण्याला फुगवटा
गावं बुडून चालली रे
निर्दयी पावसा आता तरी थांब रे ।।९।।

– **गजानन अराणके,**
वारजे, पुणे
मोबाईल- ९८८१०६१४१३

# समर्थ व्यक्तिमत्त्व आईच घडवू शकेल

'आई' या दोन अक्षरी शब्दातच मांगल्य, वात्सल्य व कारुण्य अशा तीन महासागरांचा पवित्र त्रिवेणी संगम झालेला आहे. म्हणूनच 'स्वामी तिन्ही जगांचा आईविना भिकारी' असे म्हटलेले आहे.

पौराणिक व ऐतिहासिक नव्हे तर अगदी स्वातंत्र्यपूर्व काळाचे सिंहावलोकन केले तरी सहज लक्षात येईल की राम-कौसल्या, कृष्ण-यशोदा, राजमाता कुंती व पांडव, राधा-कर्ण तसेच महाराष्ट्राच्या तेजस्वी पर्वातील शिवाजी-जिजाबाई असे अनेक मातापुत्र आजही आपले आदर्श आहेत. अगदी रामदास स्वामी, गोंदवलेकर महाराजांसारख्या संतपुरुषांचेच नव्हे तर साने गुरूजी, विनोबा भावे, अशांसारख्या महान् व्यक्तिमत्त्वांच्या बाबतीतही आई म्हणजे 'न मातु:परदैवतम्' होती.

मग आज स्वातंत्र्यानंतर साठ वर्षांचा कालावधी उलटून गेल्यावर 'आई'चा सर्वांगीण विकास व समर्थ व्यक्तिमत्त्व घडवू शकेल का असा विचार करायची वेळ का यावी ?

'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' असा गौरवशाली व अभिमानास्पद वारसा लाभलेल्या महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील स्वातंत्र्योत्तर इतिहास काय सांगतो ? किंबहुना गेल्या साठ वर्षातील देशाच्या प्रगतीचे वर्णन 1947 to AK47 अशा विदारक शब्दात करायची पाळी यावी यापेक्षा दैवदुर्विलास तो कोणता ?

आजची परिस्थिती एका दिवसात किंवा रात्रीत निर्माण झालेली नाही. स्वातंत्र्यानंतर काही वर्षे 'पंचवार्षिक' स्वप्ने बघण्यात गेली. पण नव्याची नवलाई जसजशी ओसरत गेली तसतसा भ्रमनिरास व्हायला लागला. 'शस्त्राघाताला शस्त्रच उत्तर' हा धडा चिनी आक्रमणाने शिकवला तरीही 'जो शहीद हुए है उनकी जरा याद करो कुर्बानी' आपल्या डोळ्यात पाणी आणत होती. १९६५ च्या पाक युद्धाच्या वेळी मात्र 'जय जवान जय किसान' अशी घोषणा अभिमानाने देताना 'सॅबर जेटला नॅटच उत्तर' असेही देशाभिमानाने म्हणालो. त्यानंतर १९७१ च्या बांगला देश युद्धाच्या काळात राजकीय पोलादी नेतृत्वाला तितक्याच कणखर सैनिक नेतृत्वाची साथ लाभली आणि भारतमातेने 'दुर्गामातेचे' रौद्ररुप धारण केले पण प्रश्न असा आहे की राष्ट्रीय एकात्मता दाखवायला असे समर प्रसंगच का लागतात ?

मॉरिशसच्या जागतिक मराठी परिषदेत कुसुमाग्रजांना नमस्कार करताना 'पुल' म्हणाले होते ज्यांच्या पायावर आदराने डोके ठेवावे असे पायच उरले नाहीत. राजकारणामधल्या सगळ्यांचेच पाय मातीचे आहेत म्हटल्यावर काय बोलणार ?

या सगळ्याचा एकत्रित व विपरीत परिणामाने आजची तरूण पिढी दिशाहीन झालेली आहे. चित्रपट असोत की वाहिन्यावरच्या मालिका, उच्चभ्रू घरांमधले हेवेदावे, विवाह बाह्य संबंध, कसल्यातरी प्रकारचे सूडनाट्य असेच सतत बघायला लागते प्रत्यक्षात घडते तेच छोट्या मोठ्या पडद्यावर दाखवतात आणि दाखवले जाते त्याचेच अनुकरण केले जाते असे हे दुष्टचक्र आहे - न थांबणारे.

महानगरांमधले कौटुंबिक जीवन सुद्धा आज गढूळ झालेले आहे. 'दो या तीन' किंवा 'हमारे दो' कालबाह्य होऊन 'एकही बस' चा जमाना सुद्धा आता मागे पडत चालला आहे. त्याच्यापुढची पायरी म्हणजे नवराबायकोंची 'करिअर' बिघडवणारे मूलच नको अशी कटुता निर्माण होऊ पहात आहे तिलाही आवर घालणे गरजेचे आहे. हे सारे कमी पडले म्हणूनच की काय लग्नाशिवाय एकत्र रहायचे. लग्न केलेच एवढ्या तेवढ्या कारणावरून घटस्फोट व लग्न टिकले आणि मूल झालेच तर चूल आणि मूल दोन्हीही बाई मोलकरणींवर सोपवून 'करिअर' च्या मागे धावायला नवराबायको मोकळे 'त्यामुळे जिथे घराची, संसाराची व मुलांची जबाबदारी घ्यायची तयारी नाही तिथे मुलांवर संस्कार करून उद्याची पिढी कोण व कशी घडवणार ? जी काही थोडीफार कुटुंब संस्था विशेषत: मध्यमवर्गात उरलेली आहे. तिच्यातही 'भले उसके लडके का शर्ट मेरे लडकेके शर्टसे सफेद क्यूँ ? अशी शिक्षणापेक्षा तरी आधुनिक 'मार्क्सवादाला' उत्तेजन देणारी जीवघेणी स्पर्धा चालल्याने पिढी घडण्याच्या बाबतीत 'ढुँढते रह जाओगे' अशीच अवस्था आहे.

वास्तविक पहाता प्रत्येक फुलाप्रमाणे प्रत्येक मूलही आपापला रंग, गंध, सुगंध व सौंदर्य घेऊन आलेले असते व कुणी किती व कसे व कुठे फुलायचे हे आधीच ठरलेले असते हेच मुळात पालकाने न समजल्याने ते आपली स्वप्ने त्यांच्यावर लादून त्यांचे बालपण कोमेजून टाकतात.

हे सगळे थांबवायचे असेल तर आज प्रत्येक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने व धडाडीने वावरणाऱ्या स्त्रीने घरच्या आघाडीवरची जबाबदारीही स्वेच्छेने स्वीकारायला हवी; कारण आजची स्त्री केवळ बौद्धिकदृष्ट्याच सुशिक्षित नाही तर तिच्या सांस्कृतिक व सामाजिक जाणीवांमुळे तिचे एकंदरीत व्यक्तिमत्त्व समर्थ व सक्षम आहे. अशी दुहेरी जबाबदारी तिने पेलली तरच कुटुंबसंस्था व समाज टिकेल. स्त्री ही क्षणाची पत्नी व अनंत काळाची माता आहे. त्यामुळे मुलांना जन्म देण्यापासून ते त्यांचे पालन पोषण शिक्षण, संस्कार, खेळ, व्यायाम अशा सर्व आघाड्यांवर त्यांची काळजी घेऊन त्यांना जबाबदार नागरिक घडवण्याचे महत्कार्य आईलाच करावे लागेल. कारण सरतेशेवटी विश्व हे पुरुषाचे घर असले तरी घर हेच स्त्रीचे खरे विश्व आहे हे विसरून चालणार नाही. अगदी आजच्या स्त्रीपुरुष समानतेच्या काळातही स्त्रीने गगनाला गवसणी घातली तरी 'घार हिंडतसे आकाशी, चित्त तिचे पिलांपाशी' हेच सत्य आहे. किंबहुना मातृत्व ही निसर्गानेच तिच्यावर टाकलेली जबाबदारी आहे व फक्त तीच ती स्वार्थाने पार पाडू शकेल. कारण लहान मूल म्हणजे मातीचा गोळा. जसा आकार द्यावा तशी मूर्ती घडते आणि समर्थ मातृत्वच ती घडवू शकेल.

आजची स्त्री घराबाहेर पडल्याने अगदी रोजच्या रोज नाही तरी सुट्टीच्या दिवशी मुलांशी संवाद साधणे. त्यांच्या अभ्यासाच्या व इतर अडचणी समजावून घेऊन त्यांना मार्गदर्शन करणे अशा गोष्टी आईलाच करायला पाहिजेत. आपण नोकरी धंद्यानिमित्त व्यस्त असल्याने मुलांना वेळ देऊ न शकल्याची भरपाई केवळ त्यांचे सगळे लाड पुरवून केल्याने मुले घडण्यापेक्षा बिघडण्याची शक्यता जास्त असते.

पण हे सगळे करण्याआधी आजच्या 'श्यामच्या मम्मीला परत', 'श्यामची आई ' व्हायला लागेल. 'धरतीच्या आरशात आकाशाचं प्रतिबिंब पहाणारी' बहिणाबाई चौधरींसारखी अशिक्षित आई जर शून्यातून परब्रह्म निर्माण करू शकते तर मग आजची सुशिक्षित, सुसंस्कृत व सुजाण व्यक्तिमत्त्व लाभलेली स्त्री जर ऑफिसात 'नेट'वर करिअर शकते तर तिला घरात 'नेटा'ने संसार करणे कठीण आहे ?

म्हणूनच आजच्या तरुण पिढीला परत सन्मार्गावर आणायची क्षमता आजच्या समर्थ मातृत्वाची आहे ज्यामुळे मुलांना व पर्यायाने समाजाला सावरता येईल. 'उषःकाल होता होता काळरात्र झाली' हे विसरून 'अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली' अशी ईर्षेने व जिद्दीने 'पुनश्च हरी ओम्' करण्याची गरज आहे. तसे केल्यानेच गतवैभव व गौरव प्राप्त करून देणारी तेजस्वी भावी पिढी आपल्याला लाभेल, कारण 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी' हेच शेवटी त्रिकालाबाधित सत्य आहे.

– **मुकुंद गोविंद सराफ**, विलेपार्ले (पू.) मुंबई
दूरध्वनी – २६१५०२४८

## निवृत्तीनंतर काय ?

घटका गेली, पळे गेली, अखेर आली निवृत्ती
आता थोडी चैन करू या, बदला आपली वृत्ती !
लवकर उठणे विसरा आता, खुशाल ताणून द्या
'बेड टी' ची लज्जत न्यारी, एकदा चाखून घ्या ।
चवीचवीने वाचा पेपर, फिरवून आपली दृष्टी
मापे काढा ओबामाची, अन् बुशची खरडपट्टी ! ॥१॥
टी.व्ही. पाहत चापा नाष्टा, रोज नवीन रतीब
खिल्ली उडवा भल्याभल्यांची सैल सोडुनी जीभ !
ऑफिसची ना घाई आता, रोजरोजची सुट्टी
निवांत आंघोळ, निवांत पूजा, करील मनाची तुष्टी ! ॥२॥
सावकाशीने करा भोजन, मारा आडवा हात
पुरणपोळी, कधी बिर्याणी वा, कधी साखरभात !
तांबुलसेवन नित्य असावे, कधी मसालापट्टी
वामकुक्षीला नका अंतरू, करा तिच्याशी गट्टी ! ॥३॥
सायंकाळी निवांत वेळी, आळस झटकुनी टाका
पाणीपुरीच्या वा मिसळीच्या, दुर्लक्षु नका त्या हाका !
चक्कर मारा बाईकवर वा, करा मोकळे पाय
बागेत रंगवा गप्पाष्टक वा, केवळ हॅलोऽऽ हाऽऽय ! ॥४॥
चित्र असे हे असेल आपुल्या संध्या-संसाराचे !
निवृत्ती मग रंगत जाईल, येता दिवस सुखाचे !!

– **गोविंद करमरकर**, सांगली
दूरध्वनी – ०२३३-२३२०९११

## 'काळ' वेळ

बदलत आहे अतिवेगाने हा काळ
सुख सुविधांचा झाला आहे सुकाळ
विचार आणि शहाणपणाचा मात्र अति दुष्काळ
नाती गोती संपली सर्वत्र माणुसकीची अबाळ
माणसाने केली प्रगती गाठला चंद्र नी मंगळ
शेजाऱ्यास भेटण्यास मात्र नेहमी टंगळ-मंगळ
अहो दोघे कमावतात, पण त्यांच्यात नाही मेळ
बाळाला ठेवुन पाळणाघरी साधेल मनांचा मेळ ?
उंच झाल्या इमारती, ठेंगणे झाले आभाळ
माझ्यापुढे प्रश्न पडला कसा जाईल वृद्धापकाळ
देवा आता पुरे झाला तुझा माझा खेळ
दाखव आता आम्हाला माणसुकीचा दुष्काळ

**– अशोक बुटाला, मुंबई**
भ्रमणध्वनी – ९८२३१४८९०४

## 'वृत्त्यंतरप्रकाश' – डॉ.सुहास पेठे

जन्मापासून आपल्या सोबत असतो तो आपला स्वभाव. आयुष्याच्या वाटचालीत, नोकरी व्यवसाय करीत असताना, सांसारिक सुखदुःखांना तोंड देतानाही या स्वभावाची साथ असतेच. सेवानिवृत्तीनंतर शारीरिक मानसिक स्वास्थ्य थोडेफार लाभतेही. काही मिळवायचे राहिल्याची रुखरुख असते. पण ती घालवायची कशी ? स्वभावाला थोडी मुरड घातली तर शक्य आहे. पण त्यासाठी चिंतन, मनन, प्रयोगाची आवश्यकता आहे. त्यासाठी उपयुक्त ठरेल असे एक पुस्तक आपले एक सभासद डॉ.सुहास पेठे यांनी लिहिले आहे – 'वृत्त्यंतरप्रकाश'. १३५ पानांचे अतिशय सुबोध भाषेतले हे पुस्तक सर्व वयाच्या म्हणजे जुन्यात जुन्या निवृत्तांपासून युवा निवृत्तांना Exit Policy च्या लाभार्थींनाही मार्गदर्शक आहे. केवळ परमार्थच नव्हे तर अगदी स्वार्थ साधू इच्छिणाऱ्यांनाही हे पुस्तक आपले वाटेल.

*प्रकाशक – श्री.नंदन पेठे, संतछाया, ८ पवार कॉलनी, शाहुपुरी, सातारा ४१५००२. मूल्य रु.२० मात्र.*

**– श्रीधर विश्वनाथ सहस्रबुद्धे**

# हुतात्मा आणि मृतात्मा

सर्व भौतिक सुखे मानवी मूल्याविना पैशानी मिळवता येतात या विचारांच्या व गंभीर आजाराने ग्रासलेल्या एका गृहस्थाची मृत्यूशी झुंज सुरू असते. महागड्या उपचारानाही साथ मिळत नसल्याने डॉक्टरांनी आशा सोडल्यामुळे शेवटी त्या गृहस्थाचे निधन होते. याचवेळी जगात असंख्य लोक नैसर्गिकरीत्या, विविध रोग, अपघात, आत्महत्या, दहशतवाद व युद्धात मरण पावत होते. या व्यक्तींखेरीज भारतातील पाच व्यक्तींचा समावेश असतो. व्यसनाधीनतेने शरीर जर्जर होऊन एक आत्महत्या करतो. दुसऱ्याचा वार्धक्याने, तिसरा अपघाताने तर चौथ्याचा अतिरेक्याशी लढण्यात बळी जातो. हालअपेष्टातही निरोगी व सुखी जीवन जगण्याच्या धडपडीत सामान्य माणूस असताना विलासी जीवन जगणारे व्यसनाधीनतेने प्रदीर्घकाळ हालअपेष्टा सोसून नैराश्यामुळे जीवन असह्य होऊन आत्महत्येने मृत्यूला कवटाळण्याचे धाडस करणारेही कमी नाहीत.

ही सर्व मंडळी मृत्युलोकात पोहचतात तेव्हा त्यांच्या आगमनाची नोंद घेतली जाते. त्यांच्या मृत्यूचं कारण व चित्रगुप्ताच्या नोंदीतील त्यांच्या पाप-पुण्याची माहिती तपासली जाते. असंख्य मृतात्म्यांच्या पुढील प्रवासाचा निर्णय काही क्षणात घेतला जातो. काहींना मुक्ती मिळते तर बऱ्याच जणांना नरक लोकांत स्थान मिळते. फार थोड्याजणांना स्वर्गाचे दालन दाखवले जाते. अशाच वर्गवारीत या पाच जणांची स्थाने ठरवली जातात. आजारामुळे मृत्यु पावलेल्या मृतात्म्यास त्याच्या स्वार्थी वृत्तीमुळे नरकात स्थान मिळते. जीवन एकट्यापुरते जगण्यासाठी नाही व आपण कोणाचे तरी देणे लागतो व हे ऋण जिवंतपणीच फेडायचे असते हा विचार त्याच्या मनाला शिवलाच नव्हता. त्यामुळे त्याला असंख्य नरकवासियांची सेवा करण्याचे काम दिले जाते. जन्ममृत्यूच्या अनेक फेऱ्यानंतर अमूल्य असा मानवी जन्म मिळतो, पण आत्महत्येने असे जीवन अकाली संपुष्टात आणण्याच्या गुन्ह्याखाली आत्महत्या करणाऱ्यास नरकात पाठवले जाते. जे धाडस त्याने आत्महत्येत दाखवले तेच जीवनातील आव्हानांना तोंड देण्यात दाखवले असते तर अकाली मृत्यूचा गुन्हा घडला नसता. वार्धक्यामुळे मरण पावलेल्यास परलोकांतील पुण्यात्म्यांची सेवा करण्यास पाठवले गेले कारण तो संत नव्हता, पण मानवी कर्तव्ये पार पाडून माणुसकीने जगला होता. अपघातात मरण पावलेल्या मृतात्म्यास इतर प्राणीजनाच्या जन्मासाठी पाठवण्यात आले कारण निष्काळजीपणे चालवलेल्या वाहन अपघातात त्याचे निधन झाले होते. जी बुद्धिमत्ता माणसास दिली गेली त्यात सतर्कतेचा समावेश आहे व जन्ममरणाचे शेवटचे चक्र माणसाचे असते ते सुहृदयता व कल्पकतेने वापरले पाहिजे हा मानवी जीवनाचा हेतू आहे.

शेवटी अतिरेक्यांशी दोन हात करणाऱ्या हुतात्म्याची पाळी येते. त्याचे शौर्य व देशासाठी प्राणार्पण देऊन शत्रूचे मनसुबे उधळून लावण्याचे त्याचे प्रयत्न गौरवास्पद होते. शत्रूच्या गोळीस बळी पडण्यापूर्वी त्याने अनेक अतिरेक्यांना कंठस्नान घातले होते. आपल्यामागे आपल्या कुटुंबाचे काय होईल याची चिंता न करता नि:स्वार्थ बुद्धीने आद्य कर्तव्य मानून राष्ट्राचे संरक्षण करीत असताना त्याला आलेले वीरमरण सर्वश्रेष्ठ आहे, हे चित्रगुप्ताने जाणले. चित्रगुप्तानी त्यास पृथ्वीलोकावर परत पाठवण्याचा निर्णय घेतला. खरेतर अशा हुतात्म्यास मुक्ती देऊन स्वर्गलोकांतील सर्वोच्च स्थान द्यायला हवे होते, पण राज्यकर्त्यांच्या हलगर्जीपणाची शिक्षा त्याने का भोगावी असा विचार चित्रगुप्ताने केला. सैनिक व पोलिसांच्या जबाबदारीत स्वार्थी व भ्रष्ट राजकारण्यांमुळे वाढ झाली असून देशातील नागरिकांचे जीवन धोक्यात आले आहे. ह्या हुतात्म्याने प्राण पणाला लावून त्याचे कर्तव्य नेटकेपणाने केले हे चित्रगुप्ताने जाणले. मनुष्य जन्म पुन:पुन्हा मिळत नाही तरीही देशरक्षणाचा भार सैनिकांनाच उचलावा लागतो. हुतात्म्यांच्या बलिदानाचे भांडवल राजकारणी लोक करतात, पण राष्ट्ररक्षण असे हुतात्मे पुनर्जन्मास घातल्याशिवाय होणार नसल्याने प्रत्येक वेळी नव्या रूपाने व नव्या नावाने जन्म घेतल्याशिवाय राष्ट्राचे रक्षण सोपे नाही हे चित्रगुप्तास कळले होते.

**- पुरुषोत्तम तडवळकर, पुणे**
भ्रमणध्वनी - ९४२२३०९०११

**Rajguru Travels**

**Advertisement**

## j गोजिरी

लपा छपीचा डाव सुरू झाला
श्रावण ओला होऊन आला
ओल्याचिंब पावसानंतर आले सोनेरी ऊन
सोनेरी किरणांनी धरला जणू फेर
तोच पुन्हा आली पावसाची एक सर
हिरवीगार पैठणी जणू धरती नेसली
पाचूची अंगठी बोटात घातली ।।१।।
हातात बांगड्या हिरव्यागार वेलींच्या छान
लाल गुलाबाचा कपाळी टिळा छान
टपोऱ्या थेंबांच्या मोत्यांचा गळ्यात हार
हिरव्या पैठणीच्या पदराला मोर नक्षीदार ।।२।।
श्रावणात किती नटली ही धरती
दिसते खरोखर रूपवती
मुरकते ठुमकते धरती श्रावणात हासते
चमकणाऱ्या उन्हात खूप गोजिरी दिसते ।।३।।

**- सौ.मंगला विद्याधर पुणतांबेकर,**
पुणे, दूरध्वनी : ०२०-२४४८५१८३

## अभिनंदनीय

आपल्या असोसिएशनचे एक सभासद श्री नटवरलाल र. जैन यांचे सुपूत्र चि.अभिषिक्त एम् एस् यांची कंपनीने अमेरिकेतील सियाटल जवळ रेडमंड येथे मायक्रोसॉफ्ट कंपनीच्या हेड ऑफिसमध्ये कायम स्वरूपी नेमणूक केली आहे. श्री अभिषिक्त याच्या या सुयशाबद्दल असोसिएशनतर्फे अभिनंदन.

**- सेक्रेटरी**

## समज येणार कधी ?

आमच्या काळी, तुमच्या वेळी
झडतात ना फैरी, सदासर्वकाळी !
घरातच काय, पण दारातही
स्थळाचंच काय पण वेळी अवेळी !

निमित्त असतं, तसं नसतंही
वेळ असला काय, नसला तरीही
दोन-चार वाढता वाढता
जमतात मंडळी, कधीही कुठेही !

पोटतिडकीचा तिचा स्वर
अनुभव ओकतो भराभर
होतो संताप अनावर
शब्द अपुरे, उरते फक्त थरथर !

नवा जोश नवा उत्साह
नाउमेद ना व्हायचा निग्रह !
मागचाच कित्ता गिरविण्यात अर्थ काय ?
धाडस विचारण्याचं, आपटून हात-पाय !

घडते ना असेच अधून मधून
शब्द वेगळे पण अर्थ तोच फिरफिरून
उकल शोधण्याचा केलाय का प्रयत्न ?
सांगाल काय मग -
चूक कोण नि कोण सूज्ञ ?

प्रवाह जसा परिस्थिती जशी
तुलना नकोच सापेक्षता अशी !
नीर-क्षीर न्याय हाताशी
नको हार, नको कुणाची सरशी !

**- संतोष गोरे,** अहमदनगर
भ्रमणध्वनी - ९८२२०७९९६०

## भाषेचा विनोद

एक प्रियकर व प्रेयसीचा मोबाईलवरील संवाद -
गोविंद - नीता, तू बरी आहेस ना ?
नीता - हो गोविंद, मी बरी आहे.
गोविंद - तुझा भाऊ बरा आहे ना ?
नीता - हो बरा आहे.
गोविंद - तुझी आई बरी आहे ना ?
नीता - हो बरी आहे.
गोविंद - आणि बाबा पण बरेच असतील ना ?
नीता - नाही, बाबा एकच आहेत.

**- प्रभाकर प्रभू साळगांवकर,** गोवा

## विनोदी चुटके

पत्नी - मी जर वर्तमानपत्र असते तर दिवसभर तुमच्या हातात तरी राहिले असते.

पती - तसं असतं तर रोज नवी पत्नी तरी मिळाली असती.

**********

पत्नी - (पतीला) काल मी स्वप्न पाहिलं त्यात तुम्ही मला शॉपिंगसाठी पाच हजार रुपये दिलेत. तुम्ही माझ्या स्वप्नावर पाणी नाही ना फिरवणार ?

पती - नाही. अजिबात नाही. तू ते पैसे तुझ्याजवळच ठेव.

**- पी.के.देवधर,** पुणे

**Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008**
**SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008**
**Licence to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard PSO, Pune 37on 25th of each Month**

## प्रतिक्रिया

'संवाद' च्या एप्रिलच्या अंकातील श्री.क्रांतिसेन आठवले यांचे संपादकीय मनापासून आवडले. फार भावले. त्यासाठी मन:पूर्वक अभिनंदन. 'संवाद' मधील सर्वच संपादकीय लेख अतिशय चांगले व बोधकारक असतात. मी फेब्रुवारी ०६ पासूनचे 'संवाद' चे सर्व अंक संग्रही जपून ठेवले आहेत. तो एक प्रकारचा माझा ठेवा आहे. करमत नसले म्हणजे जुने अंक चाळतो, त्यामुळे मनास बरे वाटते. नव्हे, मन प्रसन्न होते. - **सुरेश गो. काल्नेश्वरकर,**
नांदेड, दूरध्वनी: ०२४६-२२३८१८८

*************

आपला मे ०९ चा संवाद अंक मिळाला. आपल्या उत्तम वितरणामुळे अंक वेळेवर मिळतात. अंकातील संपादकीय लेख, कविता, विनोद दर्जेदार असतात. संवाद-लेख-स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे दोन्ही लेख वाचनीय व प्रशंसनीय पात्र आहेत. दोन्ही सभासदांचे मन:पूर्वक अभिनंदन. 'संवाद' केव्हा सुरू झाला याची कल्पना नाही पण 'संवाद' चे बोधचिन्ह व चार ओळी अत्यंत मार्मिक आहेत. एक सूचना त्या त्या विभागातील कार्यक्षम Active सभासदांचे नाव, पत्ता दिल्यास अडचण असलेल्या सभासदांना त्यांच्याशी संवाद साधता येईल व आपल्या समस्यांचे निराकरण करता येईल. - **अरूण भट,**
बदलापूर (पूर्व), भ्रमणध्वनी -९३२४५५८०५१

## अभिनंदनीय, अनुकरणीय

आपले एक सभासद श्री.जनार्दन बाळाजी वाढोणकर यांनी नुकतेच दि. २४ मे २००९ ला वयाच्या ७९ व्या वर्षात पदार्पण केले असून त्यांनी स्वत:ला विविध समाजोपयोगी कार्याला वाहून घेतलेले आहे. श्री.वाढोणकर यांनी ४१ वर्षे आपल्या बँकेत प्रदीर्घ सेवा केली असून आजवर त्यांनी विविध संस्थांना सुमारे १९ लाख रूपये देणगी रूपाने दिले आहेत. सत्कार्य व सत्संग यावर त्यांचा दृढ विश्वास आहे. गरीब, गरजू, आजारी, अपंग यांना त्यांचा मदतीचा हात सदैव मिळत असतो. देवाने बोनस म्हणून दिलेला प्रत्येक दिवस श्री.वाढोणकर समाजऋण फेडण्याकरिता खर्च करीत असतात. हे त्यांचे व्रत यापुढेही चालू रहावे आणि त्यासाठी त्यांना परमेश्वराने उदंड आयु व आरोग्य प्रदान करावे अशी आमची प्रार्थना आहे.

**- सेक्रेटरी**

## अभिनंदनीय

आपल्या असोसिएशनचे एक सभासद श्री.चंद्रकांत प्र. देखणे यांनी फेब्रुवारी २००९ मध्ये ज्योतिषशास्त्री परीक्षेत ५९% गुण मिळवून सुयश संपादन केले. या यशाबद्दल त्यांचे असोसिएशनतर्फे अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा.

**- सेक्रेटरी**

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.
२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.
संपर्क दूरध्वनी क्र. (०२०) २४३३२१४१

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.